cmyk

### संपादकीय

## नक्षील प्रकोप : मूळ समस्येला बगल नको

आठवड्यापूर्वी १३ व आता मंगळवारी २९ नक्षलवाद्यांना ठार करून सर्वाधिक प्रभाव असणाऱ्या बस्तरमध्ये सुरक्षा दलांनी नक्षलवाद्यांचे कंबरडे मोडले आहे. ठार झालेल्यांमध्ये शंकर राव व ललिता यांच्यासारख्या कट्टर मानल्या जाणाऱ्या नक्षली नेत्यांचा समावेश आहे. या दोघांवर सरकारने लाखो रुपयांचे बक्षीसही जाहीर केले होते. मतदान तोंडावर असताना सुरक्षा दलांनी केलेल्या अचूक कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदनच करावे लागेल.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com


## दिनेश त्रिपाठी भारतीय नौदलाचे नवे प्रमुख

नवी दिल्ली: भारत सरकारने नौदलाचे प्रमुख म्हणून दिनेश त्रिपाठी यांची नियुक्ती केली. ते सध्या नोदलाचे उपप्रमुख आहेत. दिनेश त्रिपाठी नौदलाचे प्रमुख म्हणून महिना अखेरीस ३० एप्रिलला पदभार स्वीकारणार आहेत. केंद्र सरकारने गुरुवारी (१८ एप्रिल) रात्री उशिरा त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली. दिनेश त्रिपाठी मागच्या ४० वर्षांपासून नौदलात कार्यरत आहेत. त्यांच्या या प्रदिर्घ कारकिर्दीत त्यांनी अनेक महत्वाच्या कामगिरी आणि जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. सध्या ते नौदलाचे उपप्रमुख असून यापूर्वी ते पश्चिम नौदल कमांडचे फ्लॅग ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ होते.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१० | शनिवार दि.२० एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

# शासनाच्या चुकिच्या धोरणामुळे शेतकऱ्यांना आत्मनिर्भर होण्यास अडथळा

## घोषणा आणि धोरणात ताळमेळ बसेना, शेतकऱ्यांची डाळवर्गीय पिकांना नापसंती

**पुणे । पतिनिधी**

**तूर, हरभरा मूग, उडीद, मसूर, वाटाणा यांसारख्या डाळवर्गीय पिकांच्या उत्पादनात केंद्र सरकारने देशाला आत्मनिर्भर बनवण्याचा निर्धार केला आहे. त्यासाठीची तरतूद देखील यंदाच्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. मात्र, खरीप हंगाम अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. अशातच या पिकांचे आयात-निर्यात धोरण, हमीभावाने केवळ २५ टक्के डाळवर्गीय पिकांची खरेदी, आयात शुल्कात संपूर्ण माफी यांसारख्या धोरणांमुळे या पिकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना एक निश्चित उत्पन्न मिळत नसल्याने, शेतकरी या पिकांना लागवडीस फाटा देत आहेत. त्यामुळे आता एकीकडे विरोधी धोरण राबविले जात असेल तर देश डाळवर्गीय पिकांच्या उत्पादनात आत्मनिर्भर होणार कसा? प्रश्न उपस्थित होत आहे.**

तूर, हरभरा मूग, उडीद, मसूर, वाटाणा यासारख्या डाळवर्गीय पिकांच्या लागवडीबाबत शेतकऱ्यांमध्ये उत्साह नाही. यामागील सर्वात मोठे कारण म्हणजे या पिकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळणारे एकरी उत्पन्न हे खूपच कमी असते. वातावरणीय बदलामुळे या पिकांची उत्पादकता कमी असल्याने, त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होतो. त्यातच या पिकांना योग्य बाजारभाव न मिळाल्यास शेतकरी त्यापासून दूर जातात. याशिवाय इतर पिकांप्रमाणे तूर, हरभरा, मूग, उडीद, मसूर, वाटाणा या डाळवर्गीय पिकांची किमान आधारभूत किमतीने खरेदी होत नाही. प्रामुख्याने सरकारकडून केवळ २५ टक्के मालाची खरेदी होते. ज्यामुळे शेतकऱ्यांना



या पिकांबाबत अनिश्चितता वाटते. परिणामी, ते या पिकांच्या लागवडीबाबत अनुत्सुकता ◀◀ पान २ वर

### डाळवर्गीय पिकांना हमीभावाच्या कक्षेत आणण्याची गरज

देशाला तूर, हरभरा, मूग, उडीद, मसूर, वाटाणा या डाळवर्गीय पिकांच्या उत्पादनात आत्मनिर्भर बनवायचे असेल. तर केंद्र सरकारला देशातील डाळवर्गीय पिकांचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना सर्वप्रथम आर्थिकदृष्ट्या मजबूत करावे लागणार आहे. तेव्हाच शेतकरी या पिकांच्या लागवडीकडे मोठ्या प्रमाणात वळतील. यासाठी केंद्र सरकारने दिल्लीतील शेतकरी आंदोलकांना दिलेला तीन डाळवर्गीय पिकांना हमीभावाच्या कक्षेत आणण्याचा प्रस्ताव प्रत्यक्षात आणावा लागणार आहे.

# पंकजा मुंडेंचा मुस्लिम, मराठा तर सोनवणेंचा ओबीसी मतांवर डोळा

## मतांची विभागणी करण्यासाठी समाजासमाजाच्या भेटीगाठींसह बैठकांवर जोर





**विशेष प्रतिनिधी । बीड**

**भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षांच्या विचाराने प्रेरित झालेल्या मतदारांची संख्या बीड लोकसभा मतदार संघात जास्त आहे. ओबीसी म्हटले की भाजप आणि मराठा, मुस्लिम म्हटले की राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट याच पक्षाचे नाव तोंडावर येते. त्यामुळे आपल्या हक्काची मते तर आहेत, असे ग्रहीत धरून पंकजाताई मुंडे यांच्याकडून मराठा व मुस्लिम तर बजरंग सोनवणे यांच्याकडून ओबीसींसह मारवाडी आणि ब्राम्हण समाजाच्या मतांवर डोळा असल्याची चर्चा आहे. त्यादृष्टीने मतांची विभागणी व्हावी यासाठी समाजासमाजाच्या भेटीगाठीसह बैठकांवर दोन्ही उमेदवारांचा जोर असल्याचे दिसून येत आहे.**

### अंदाजित आकडेवारी

मराठा समाज ६ लाख १० हजार
वंजारी समाज ४ लाख ७० हजार
मागासवर्गीय समाज २.१० लाख
मारवाडी, ब्राम्हण समाज ८५ लाख
बंजारा समाज १ लाख १० हजार
धनगर समाज २ लाख १० हजार
मुस्लिम ाज २.२० लाख
माळी समाज १ लाख २० हजार
इतर ओबीसी समाज ८० हजार ८१३
२१ लाख १५ हजार ८१३
**(ही आकडेवारी अंदाजीत आहेत, याची खांत्री आम्ही देत नाहीत.)**

बीड लोकसभा मतदार संघात २१ लाख १५ हजार ८१३ मतदार आहेत. गेल्या लोकसभा निवडणुकीत ६६ टक्के मतदान झाले होते. त्यावेळी भाजपच्या प्रितम मुंडे यांना ६ लाख ७८ हजार १७५ मते तर राष्ट्रवादी काँग्रेसचे बजरंग सोनवणे यांना ५ लाख ९ हजार ८०७ मते मिळाली होती. यात मुंडे यांचा १ लाख ६८ हजार २६८ मताधिक्याने विजय झाला ◀◀ पान २ वर


### एमआयएमची भुमिका महत्वाची राहणार

मुस्लिम समाजाची मते २ ते ३ लाख असल्याने ती निर्णायक ठरणार आहेत. त्यामुळे ही मते आपल्या पदरात पाडून घेण्यासाठी मुंडे आणि सोनवणे यांच्याकडून डावपेच आखले जाण्याची चर्चा आहे. एमआयएमकडून या निवडणुकीत जर उमेदवार दिला नाही तर त्याचा थेट फायदा बजरंग सोनवणे यांना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तर उमेदवार दिला तर त्याचा थेट फायदा पंकजा मुंडे यांना होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या निवडणुकीत एमआयएमची भुमिका निर्णायक राहणार असल्याचे दिसते.

### मराठा, मुस्लिम, वंजारी समाजाशिवाय दुसरे नाहीत का?

मुंडे आणि सोनवणे यांच्याकडून सध्या मराठा, मुस्लिम आणि वंजारी समाजाला ग्रहीत धरुनच प्रचार केला जात असल्याचे दिसते. मात्र बीड लोकसभा मतदारसंघात इतरही समाज आहे. हा समाज दुर्लक्षित असून या समाजाचे प्रश्न आणि त्यांच्या मागण्यांकडे पंकजा मुंडे आणि बजरंग सोनवणे यांच्याकडे वेळ नाही की काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# नाशिकमधून माझी पूर्णपणे माघार-भुजबळ



**नाशिक । प्रतिनिधी**

**नाशिक लोकसभा निवडणूकीच्या रिंगणातून छगन भुजबळ यांनी माघार घेतली आहे. नाशिकमधून मी माघार घेत असल्याची घोषणा छगन भुजबळ यांनी मुंबई येथे पत्रकारपरिषद घेऊन केली आहे. भुजबळांनी स्वत:च आपण माघार घेत असल्याचे सांगितल्याने त्यांच्या नाशिकमधून उमेदवारी विषयीच्या चर्चेला आता पूर्णविराम मिळाला आहे.**

भुजबळ म्हणाले, आम्ही नाशिकच्या जागेविषयी मागणी केली होती. समीर भुजबळांसाठी जागा मागितली होती. मात्र, अमित शहा म्हणाले तुम्ही असाल तरच ठीक आहे. देवेंद्र फडणवीस यांनीही तेच सांगितलं. तुम्हीच नाशिकची जागा लढावावी अशा केंद्रातून सूचना असल्याचे सांगितले. गृहमंत्री अमित शहा यांनी माझ्यावर विश्वास दाखवून माझ्या नावाची शिफारस केल्याने मी त्यांचे धन्यवाद मानतो. माझे नाव चर्चेत आल्यानंतर सर्वच समाजातील बांधवांनी मला सपोर्ट केला, अगदी मराठा बांधवांनीही माझ्या नावाचे स्वागत केले. त्या सगळ्यांचे आभार मानत मी नाशिकमधून माघार घेत आहे, अशी घोषणा भुजबळांनी केली. भुजबळ पुढे म्हणाले, नाशिकमध्ये महाविकास आघाडीचा प्रचार पुढे गेला आहे. महायुतीचा मात्र आजूनही तिढा कायम कायम. महायुतीकडून उशीर होत आहे. ताबडतोफ निर्णय घेण गरजेचे आहे, नाहीतर नुकसान होऊ शकते. उगीच अडचण निर्माण होईल त्यामुळे लवकर निर्णय घ्यायला हवा. दरम्यान, छगन भुजबळ यांनी माघार घेतल्याने शिंदे गटाचे हेमंत गोडसे यांचा मार्ग सुकर झाला आहे.

# कोयता दाखवून नेता होणाऱ्यानी ऊसतोड मजुरासाठी काय केले?

### बजरंग सोनवणेंचा पंकजा मुंडेंवर हल्लाबोल

**गेवराई । प्रतिनिधी**

कोयता दाखवून नेता होणाऱ्यानी ऊसतोड कामगारांच्या व्यथा, कष्ट, अडीअडचणी व दुःख कमी करण्यासाठी त्यांनी काय प्रयत्न केले ? त्यांना ऊस तोडणी करून मोळ्या वाहता येतील का ? अशा खरमरीत शब्दात इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी ऊसतोड कामगारांच्या नेत्या म्हणणाऱ्या पंकजाताईचे नाव न घेता हल्लाबोल केला.

गेवराई तालुक्यात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे हे प्रचारादरम्यान बोलत होते. यावेळी माजी आमदार बदामराव पंडित, पूजाताई मोरे, युवा नेते युद्धजीत पंडित यांच्यासह इंडिया आघाडीतील घटक पक्षांचे नेते पंढरीनाथ लगड, अण्णासाहेब राठोड, पँथर्स रिपब्लिकन ◀◀ पान २ वर

# सुडाचे राजकारण कधीच केले नाही-पंकजाताई मुंडे



**गेवराई । प्रतिनिधी**

**भाजप आणि महायुतीतील सर्व घटक पक्ष एकत्र येऊन लोकसभा निवडणुकीला सामोरे जात आहेत. यापूर्वी मंत्रीपदाच्या कार्यकाळात मी कायम विकासाला केंद्रबिंदू ठेवले कधीच सुडाचे राजकारण केले नाही की, कोणाला त्रास दिला नाही. देशाच्या पंतप्रधानपदी पुन्हा एकदा नरेंद्र मोदीजी विराजमान होणार आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी तुम्ही सर्वजण मला प्रचंड मताधिक्यांनी विजयी कराल हा विश्वास आहे. जिल्ह्याचा विकास हाच माझा ध्यास आहे असे प्रतिपादन पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले.**

लोकसभा निवडणूक ही, स्वाभिमानाची लढाई जिंकण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना सर्वाधिक मतांनी निवडून आणणे हा आपल्या सर्वांच्या स्वाभिमानाचा मुद्दा आहे, त्यामुळे प्रचंड मताधिक्याने पंकजाताई मुंडे यांना निवडून द्या असे आवाहन राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे ◀◀ पान २ वर

### विरोधी उमेदवार दुसऱ्या की तिसऱ्या स्थानावर राहतो हे कळेलच-धनंजय मुंडे

पालकमंत्री धनंजय मुंडे यावेळी म्हणाले, हा मेळावा अभूतपूर्व ठरला आहे. पंकजाताई मुंडे यांना विधानसभा आणि राज्य मंत्रिमंडळात मंत्री म्हणून काम केल्याचा प्रदीर्घ अनुभव आहे, अशावेळी आपला विरोधी उमेदवार आता दुसऱ्या स्थानावर राहतो की तिसऱ्या हे लवकरच कळणार आहे. अमरसिंह पंडित यांनी मला 'कायम कृषी मंत्री राहो' अशा शुभेच्छा मला दिल्या आहेत असे सांगत धनंजय मुंडे म्हणाले,

### दिलेला शब्द पाळण्याची शिवछत्र परिवाराची परंपरा-अमरसिंह पंडित

यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित म्हणाले, ऊसतोड कामगारांचा जिल्हा ही ओळख आता आपल्याला बदलायची आहे. पंकजाताई मुंडे यांनी देशाच्या सर्वोच्च सभागृहात बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करावे यासाठी आम्ही सर्वजण त्यांना प्रचंड मताधिक्य मिळवून देऊ. दिलेला शब्द पाळायचा ही आमची शिवछत्र परिवाराची परंपरा आहे. या निवडणुकीत पंकजाताई मुंडे यांच्या विजयासाठी मतदारसंघातील प्रत्येक घराच्या चौकटीपर्यंत जाऊन मत मागील असे ते म्हणाले.

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१९ एप्रिल २०२३**

आवक क्किंटलमध्ये तर भाव प्रतिक्किंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ५७.०० क्किंटल | २,२५१ | ३,१५० | २,५५३ |
| ज्वारी/हायब्रिड : २४५.०० क्किंटल | १,६०० | ३,२८० | २,६२४ |
| मूग : ०.५० क्किंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : ७२.५० क्किंटल | ९,००० | १०,९०० | १०,४८४ |
| उडीद : १.५० क्किंटल | ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: २३.०० क्किंटल | १,७६१ | २,७४० | २,४१३ |
| चिंचोका/लोकल: ८.०० क्किंटल | २,४०० | २,४०० | २,४०० |
| सोयाबीन: १२५.५० क्किंटल | ४,५५० | ४,६११ | ४,५८९ |
| हरभरा: १२.५० क्किंटल | ५,००० | ६,५०० | ५,७३७ |

# हिवरा येथील लगड वस्तीवर बिबट्याचा कूत्र्यावर हल्ला

**कडा । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील हिवरा - पिंपरखेड येथील दि.१८.एप्रिल च्या रात्री. ८.ते ८.३०.दरम्यान हिवरा येथील लगड वस्ती वरील एका कूत्र:यावरती बिबट्याने हल्ला केला. असून हिवरा-पिपरखेड परिसरामधील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

◀◀ पान २ वर



# दोन महिन्यांनंतर शिंदे दिसणार नाहीत-प्रकाश आंबेडकर





**हिंगोली । प्रतिनिधी**

**पंतप्रधान मोदी यांनी ईडी, इन्कम टॅक्स, सीबीआय व इतर यंत्रणाचा वापर करुन १६ हजार कोटींचे इलेक्ट्रोल बॉन्डच्या माध्यमातून कमाई केली आहे. येथील महायुतीचा उमेदवार शिंदे गटाचा आहे. परंतु, शिंदे हेच दोन महिन्यानंतर दिसणार नाहीत, असा दावा वंचितचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.**

हिंगोली येथील इंदिरा गांधी चौकाशेजारी वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ आंबेडकर यांची सभा पार पडली. यावेळी ते म्हणाले की, मोदी गॅरंटी हा नारा सध्या भाजपकडून दिला जात आहे. स्वतःचे कुटुंब सांभाळू शकत नसलेला माणूस गॅरंटी देऊ शकत नाही. भारतातील सतरा लाख कुटुंबियांनी मोदी सरकारच्या काळात नागरिकत्व सोडले आहे. राज्यसभेत याचे दाखले आहेत. यामुळे मोदी कुठल्या तोंडाने मते मागीत आहेत. हिंदू कुटूंब देश सोडून जात असताना हिंदुत्वाच्या नावावर मत मागणे कितपत योग्य आहे, असा सवालही आंबेडकर यांनी उपस्थित केला. सभेत उपस्थित जनतेला त्यांनी येथे वसुली करणारा कुणी आहे का? असा प्रश्न उपस्थित केला. यावेळी एका शिंदे गटाच्या लोकप्रतिनिधीचे नाव सभेतील लोकांनी घेतल्यानंतर तो भुरटा चोर आहे. परंतु, खरा डाकू दिल्लीच्या पंतप्रधान कार्यालयात बसला आहे, असा निशाणा त्यांनी साधला. येथील डाकू वेगवेगळ्या यंत्रणाचा धाक दाखवून १६ हजार कोटींची वसुली करीत आहे. हे सरकार भांडवलदारांचे सरकार आहे. देशाचा नकाशा बदलणारी व्यक्ती पंतप्रधानपदी योग्य आहे का? असा सवालही त्यांनी केला. चायनाच्या कंपनीला इलेक्ट्रोल बॉन्ड दिल्यामुळे चायना छाताडावर बसला आहे. यासाठी नरोबा, कुंजरोबा, ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# नक्षील प्रकोप : मूळ समस्येला बगल नको

आठवड्यापूर्वी १३ व आता मंगळवारी २९ नक्षलवाद्यांना ठार करून सर्वाधिक प्रभाव असणाऱ्या बस्तरमध्ये सुरक्षा दलांनी नक्षलवाद्यांचे कंबरडे मोडले आहे. ठार झालेल्यांमध्ये शंकर राव व ललिता यांच्यासारख्या कट्टर मानल्या जाणाऱ्या नक्षली नेत्यांचा समावेश आहे. या दोघांवर सरकारने लाखो रुपयांचे बक्षीसही जाहीर केले होते. मतदान तोंडावर असताना सुरक्षा दलांनी केलेल्या अचूक कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदनच करावे लागेल. कारण नक्षलवाद्यांचा लोकशाही प्रक्रियेवर व भारतीय संविधानावर विश्वास नाही. त्यांना बंदुकीच्या जोरावर व्यवस्था बदलायची आहे आणि म्हणूनच त्यांचा निवडणूक प्रक्रियेस विरोध आहे.

काही दिवसांपूर्वीच छत्तीसगडमधील सभेत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता व येत्या तीन वर्षांत देशाला नक्षलवाद्यांपासून मुक्त करू अशी घोषणा केली होती. त्या अनुषंगाने सुरक्षा दलाच्या या मोठ्या कारवायांचा आनंद सरकारी पातळीवर साजरा होणे सध्याच्या परिस्थितीत अपेक्षितच. मात्र, दीर्घकाळापासूनच्या या समस्येचे समूळ उच्चाटन अद्यापही सरकारला करता आलेले नाही, हेच या चकमकींमधून स्पष्ट होते. सुमारे चाळीस वर्षांपासून ही समस्या देशाला सतत भेडसावते आहे व सरकार त्याचे समूळ उच्चाटन करण्यात अपयशीच ठरते आहे. चकमकींमध्ये नक्षल्यांना कंठस्नान घातल्यावर सरकार आपली पाठ थोपटून घेते व नक्षलवादाचा बीमोड करण्याच्या गर्जना करते. मात्र, नक्षलवाद्यांना यमसदनास पाठविल्याने नक्षलवादाचा समूळ नायनाट होत नाही हे कटू वास्तव आहे. मारले गेलेल्यांची जागा दुसरे भरून काढतात. ही प्रक्रिया सरकारला केवळ गोळीला गोळीने उत्तर देऊन थांबविता येऊ शकत नाही, हेच वास्तव आहे. समस्येचे समूळ निराकरण करायचे असेल तर समस्येच्या मुळाशी जाऊन मूळ दुखण्यावर उपचार करावे लागतील. हे सरकारला कळत नाही असेही नाही. नक्षलवादाच्या समस्येवर कायदा व सुव्यवस्था आणि विकास या दोन्ही आघाड्यांवर एकाच वेळी प्रभावी काम करणे गरजेचे आहे आणि सरकारने हे सूत्र स्वीकारलेले आहे. मात्र, त्याच्या अंमलबजावणीच्या वेळेस सरकारचा भर हा केवळ कायदा व सुव्यवस्थेवरच असतो. त्यामुळे मोठ्या संख्येने नक्षलींना ठार केले की नक्षलवाद मोडून काढण्यात यश आले, हाच समज सरकारी पातळीवर दृढ झाल्याचे पहायला मिळते. गृहमंत्र्यांचे ताजे वक्तव्यही याच समजातून आलेले दिसते. मात्र, ज्या विषमतेतून व असमतोलातून या समस्येचा जन्म झाला तो रोग मुळातून दूर करायचा तर त्यावर विकासाचेच रामबाण औषध हवे याचा विसर सरकारला व प्रशासनाला पडलेला दिसतो. त्याच्या परिणामी फक्त मारल्या जाणाऱ्या नक्षल्यांचे चेहरे व नावे तेवढी बदलत गेली पण हिंसाचार थांबला नाही की, नक्षलवाद संपुष्टात आला नाही. नोटबंदीची घोषणा करताना पंतप्रधान मोदी यांनी नक्षल्यांना व अतिरेक्यांना होणाऱ्या अर्थपुरवठ्यावर नोटबंदीने आळा घातला जाईल अशी पुस्ती जोडली होती. प्रत्यक्षात असा अर्थपुरवठा कमी होण्याऐवजी वाढल्याचेच दिसते. नक्षल्यांकडून अलीकडच्या काळात जो शस्त्रसाठा जप्त करण्यात आला त्यावरून हे सिद्धच होते. एक हजार मीटरपर्यंत मारा करू शकणाऱ्या एलएमजी बंदुका, रॉकेट व ग्रेनेड लाँचर्स नक्षल्यांकडून जप्त करण्यात आले आहेत. ज्या भागात रेशन पुरवठा सुरळीत करण्यात सरकारला अद्याप यश आलेले नाही त्या भागात नक्षल्यांना एवढ्या अद्ययावत शस्त्रास्त्रांचा पुरवठा एवढ्या विपुल प्रमाणात होतो हे सरकारी यंत्रणांचे अपयशच नाही काय? माओवादी दहशतीला कथित राजकीय तत्त्वज्ञानाचे बळ असल्याने त्याकडे पाहण्याची अनेकांची दृष्टी ही उगाच मवाळ होते, असेच निदर्शनास येते.

# चैत्री यात्रेसाठी पंढरीत तीन लाख भाविक दाखल

**पंढरपूर । प्रतिनिधी**

**पंढरीतील विठुरायाच्या चैत्री वारी सोहळ्यासाठी, पंढरीत तीन लाख भाविकांनी हजेरी लावली. विठूनामाचा जयघोष करीत पंढरीनगरी दुमदुमून सोडली. हरिनामाच्या गजराने मंदिर परिसर न्हाऊन निघाला. पंढरीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचा चैत्री वारी सोहळा मोठ्या थाटात पार पडला. शुक्रवार दि.१९ एप्रिल रोजी सुमारे तीन लाख भाविकांनी पंढरीत हजेरी लावली.**

पंढरपूर शहरातील विविध मठ आणि मंदिरांमध्ये भाविकांची गर्दी झाली. दरवर्षीच या वारी सोहळ्यावर उन्हाळ्याचे सावट असते. चैत्रात पडणारे कडक ऊन, अन् पुढे शिंगणापूरला जाण्याची ओढ भाविकांमध्ये असते. यामुळे या वारीला पळती वारी अथवा धावती वारी संबोधले जाते. गेल्या दोन तीन दिवसापासून पंढरी नगरीत भाविकांची गर्दी वाढू लागली होती. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात जीर्णोद्धाराचे काम सुरू असल्याने, विठुरायाचे पदस्पर्श दर्शन बंद होते. चैत्री वारीच्या पार्श्वभूमीवर हे दर्शन सुरू करण्यात आले असल्याची माहिती भाविकांना होती. यामुळेच गेल्या दोन-तीन महिन्यात थांबलेली भाविकांची वर्दळ या वारीच्या रूपाने पुन्हा सुरू झाली. खाजगी वाहन, बसेस आणि रेल्वेचा प्रवास करून भाविकांनी पंढरी गाठली. मंदिर परिसरात भाविकांच्या सोयीसाठी मंदिरा सभोवताली कार्पेट बांधण्यात आले आहेत. यामुळे भाविकांना उन्हाचा त्रास होत नाही. याशिवाय दर्शन मंडपात भाविकांना थंड पाणी, चहा, नाश्ता आदींची सोय करण्यात आली आहे. पंढरपूर शहरातील स्टेशन रोड, चौफाळा, प्रदक्षिणा मार्ग, चंद्रभागा वाळवंट परिसर, ६५ एकर परिसर आदी परिसर भाविकांनी गजबजवून गेला आहे. हरिनामाच्या गजराने पंढरी नगरी न्हाऊन निघाली आहे.

# पंकजा मुंडेंना विक्रमी मताधिक्य देण्यासाठी कार्यकर्त्यांनी परळी शहर पिंजून काढले

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

**भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या ऐतिहासिक विजयात परळी शहराचे मोठे योगदान देण्यासाठी कार्यकर्ते सरसावले असुन दररोज दोन सत्रात विविध भागात प्रचारफेरी काढली जात आहे. गेल्या चार दिवसांपासून कार्यकर्ते विविध भागात जाऊन मतदारांच्या भेटी घेत आहेत. मतदारांचा देखील त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.**



शहरात आज सकाळी विठ्ठल मंदिर जाजूवाडी,पद्मावती, इंदिरानगर, संभाजी नगर, रहेमतनगर, तुळजानगर, डॉ.देशपांडे हॉस्पिटल परिसर तर सायंकाळी शाहूनगर, रामनगर, वैद्यनाथ गल्ली, देशमुख पार, जुना पेठमोहल्ला, सुर्वेश्वर नगर, ठाकूर गल्ली, राजपूत गल्ली, भोईगल्ली आदी परिसरात प्रचार फेरी पार पडली. परळी शहरातील नागरिकांमध्ये पंकजाताई मुंडे यांना मतदान करण्यासाठी मोठा उत्साह दिसून येत आहे. पंकजाताईंच्या विजयात परळी शहराचे निश्चित मोठे योगदान असणार आहे याचा निर्धार परळीकरांनी केला आहे.आजच्या या प्रचार फेरीत भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना आदी घटक पक्षाचे नेतेगण, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पहिल्या टप्प्यात देशात ६० तर राज्यात ५४.८५ टक्के मतदान

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यासह देशभरात शुक्रवारी लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान पार पडले. यामध्ये देशात ६० तर राज्यात ५४.८५ टक्के मतदान झाल्याचे दिसून आले आहे.**

महाराष्ट्रातील ४८ पैकी ५ मतदारसंघांमध्ये लोकसभेची निवडणूक पार पडली. यामध्ये रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर या मतदारसंघांचा समावेश आहे. या पाचही मतदारसंघांमध्ये सकाळी ७ वाजेपासून मतदानाला सुरुवात झाली होती. या पाच मतदारसंघांमध्ये संध्याकाळी ५ वाजेपर्यंत एकूण ५४.८५ टक्के मतदान झाले. मतदानाचा हा आकडा खरंतर जास्त असणे अपेक्षित होते. पण तसे झाले नाही. विशेष म्हणजे नक्षलग्रस्त मानल्या जाणाऱ्या गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघात इतर चार मतदारसंघांच्या तुलनेत सर्वाधिक मतदान झाले आहे. गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघात ६४.९५ टक्के मतदान झाले आहे. नागपूर सारख्या लोकसभा मतदारसंघात सर्वात कमी टक्के मतदान झाले आहे. नागपूरमध्ये संध्याकाळी ५ वाजेपर्यंत केवळ ४७.९१ टक्के मतदान झाले. महाराष्ट्रातील ५ लोकसभा मतदारसंघामध्ये



सर्वाधिक मतदान गडचिरोली-चिमूर मतदारसंघानंतर भंडारा-गोंदिया मतदारसंघात झाले आहे. इथे ५६.८७ टक्के मतदान झाले आहे. त्यानंतर चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाचा क्रमांक लागतो. इथे ५५.११ टक्के मतदान झाले आहे. यानंतर रामटेक लोकसभा मतदारसंघात ५२.३८ टक्के मतदान झाले.

सर्वात कमी मतदान हे नागपूरमध्ये ४७.९१ टक्के इतके झाले. दरम्यान, चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात काही ठिकाणी व्हीव्हीपॅटमधील गोंधळ तर काही ठिकाणी मतदार यादीत नागरिकांची नावे गहाळ असल्याची अनेक प्रकरणे पुढे आली. यामुळे नागरिक मतदान केंद्रावरून बाहेर जाताना दिसले. काही ठिकाणी नागरिकांनी याबद्दल तीव्र नाराजी देखील व्यक्त केली. मतदान कार्ड अपडेट झाल्यामुळे देखील काहींची नावे यादीतून गहाळ झाल्याचे बघायला मिळाले. उन्हाचा तीव्र तडाखा बघता संध्याकाळच्या सुमारास नागरिकांनी मतदान केंद्रावर येणे पसंत केले. मात्र यादीत नावच नसल्याने अनेकांना परत जावे लागले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ६४.८४ टक्के एवढे मतदान झाले होते. प्रशासनाच्या अनेक प्रयत्नानंतरही पाच वाजेपर्यंत हे मतदान ५५.११% एवढे झाले होते. अंतिम आकडेवारी मात्र रात्री उशिरापर्यंत येण्याची शक्यता आहे.

# येस बँक घोटाळ्यात राणा कपूर तब्बल ४ वर्षांनंतर जामीन मंजूर

**मुंबई । प्रतिनिधी**

**येस बँक घोटाळा प्रकरणातील मुख्य आरोपी राणा कपूर यांना विशेष न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. तब्बल चार वर्षांनी त्यांना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. राणा कपूर हे येस बँकेचे सह-संस्थापक आहेत. येस बँकेशी संबंधित असेलेल्या ४६६ कोटी ५१ लाखांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणात राणा कपूर यांना अटक करण्यात आली होती. मात्र आत विशेष न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला असून, ते आता लवकरच तुरुंगाबाहेर येणार आहेत.**



येस बँकेच्या आर्थक घोटाळयाप्रकरणी सीबीआय आणि ईडीकडून तपास केला जात आहे. आर्थिक अनियमितता आणि वारेमाप बेहिशेबी कर्जवाटप यामुळे रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) येस बँकेवर ५ मार्च २०२१ पासून निर्बंध लागू केले होते. त्यानंतर टप्पाटप्प्याने ते निर्बंध शिथिल केले गेले आणि येस बँकेचे सर्व व्यवहार पूर्ववत करण्यात आले. मात्र, बड्या उद्योगांना दिलेली अनेक कर्जे बुडीत खात्यात गेल्यानं बँकेची आर्थिक स्थिती अतिशय कमकुवत झाली आहे. हा घोटाळा उघड झाल्यानंतर येस बँकेचे सह-संस्थापक राणा कपूर यांना अटक करण्यात आली होती. त्यानंतर त्यांची पत्नी बिंदू यांच्यासह मुली रोशनी आणि राधा कपूर खन्ना यांनाही अटक करण्यात आली.

# बाबा रामदेव यांच्याविरुद्ध फौजदारी तक्रार करणाऱ्यांना खटल्यात पक्षकार करा-सुप्रीम कोर्ट

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**कोरोना काळात योगगुरू बाबा रामदेव यांनी ॲलोपॅथिक औषधींच्या वापराबाबत केलेल्या वादग्रस्त विधानाबद्दल बिहारच्या पाटणा आणि छत्तीसगडच्या रायपूर येथील इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) शाखेने बाबा रामदेव यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. या लोकांना सध्या सुरु असलेल्या खटल्यामध्ये पक्षकार म्हणून सामील करा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी (दि.१९) रोजी दिले.**



ॲलोपॅथी औषधींबाबत केलेल्या कथित वादग्रस्त विधानाबद्दल आपल्याविरुद्ध आयएमए संघटनेने पाटणा आणि रायपूर येथे दाखल केलेल्या फौजदारी गुन्ह्यांच्या कारवाईला स्थगिती देण्याच्या मागणीसाठी बाबा रामदेव यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर न्यायमूर्ती एस.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती पी. बी. वराळे यांच्या खंडपीठापुढे सुनावणी सुरु आहे. सुनावणीदरम्यान न्यायालयाने बाबा रामदेव यांच्याविरुद्ध फौजदारी तक्रार करणाऱ्या आयएमएच्या दोन्ही शाखांना या खटल्यात पक्षकार बनविण्याचे निर्देश दिले. बाबा रामदेव यांनी आपल्या याचिकेत केंद्रसरकार, बिहार सरकार, छत्तीसगड सरकार आणि आयएमएला पक्षकार बनविले आहे. बिहार सरकारच्या वकिलांनी या प्रकरणात उत्तर देण्यासाठी न्यायालयाकडे अवधी मागितला. ॲलोपॅथी औषधींवर माझा अजिबात विश्वास नाही. या औषधींच्या वापरामुळे कोरोना काळात अनेक लोकांचा मृत्यू झाला, असे वादग्रस्त विधान योगगुरू बाबा रामदेव यांनी केले होते. या विधानानंतर आयएमएच्या बिहार व छत्तीसगड शाखेने बाबा रामदेव यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल केले होते. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी आता उन्हाळ्याच्या सुटीनंतर ठेवली आहे.

## पान १वरून...

### शासनाच्या चुकिच्या धोरणामुळे शेतकऱ्यांना

दाखवत आहेत. केंद्र सरकारने तूर, हरभरा, मूग, उडीद, मसूर, वाटाणा या पिकांच्या खरेदीसाठी प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षा अभियानाअंतर्गत २५ टक्के खरेदी बंधनकारक केली खरी, मात्र देशातील शेतकऱ्यांकडील उत्पादित ७५ टक्के डाळवर्गीय पिकांच्या उत्पादनाला तुलनेने कमी भाव मिळतो. ज्यामुळे शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्यात अडचण येत आहेत. याशिवाय केंद्र सरकारने गेल्या काही वर्षांपासून डाळींच्या आयात शुल्कात संपूर्णतः माफी दिली आहे. ज्यामुळे बाहेरचा माल देशात कोणत्याही शुल्काविना मोठ्या प्रमाणात भारतीय बाजारपेठेत दाखल होतो. ज्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादित डाळवर्गीय पिकांना कमी दर मिळताना दिसतो.

-------------

### पंकजा मुंडेंचा मुस्लिम,

होता. मुंडे यांच्याकडे सर्वाधिक ओबीसी समाज आकर्षित झाला होता. मराठा, मुस्लिम समाजाची मतेही त्यांना पडली होती. यावेळी भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्यासह महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्याकडून समाजासमाजातील मतांची विभागणी व्हावी यासाठी प्रयत्न केले जात आहे. प्रत्येक समाजाची मते आपल्या पदरात पडावी यासाठी व्युहरचना केली जात असून पंकजा मुंडे यांना यावेळी मराठा, मुस्लिम आणि मागासवर्गीय समाजाची मते प्रितम मुंडे यांच्या प्रमाणे पडतील असे दिसत नाही. मराठा आरक्षणामुळे मराठा समाज बजरंग सोनवणे आणि अशोक हिंगे यांच्या पाठीशी राहील असा अंदाज आहे. तर ओबीसी मते पंकजा मुंडे यांच्या बाजूने झुकतील असे दिसते. मात्र आपल्या हक्काची मते तर आपल्याला मिळणार असल्याचे ग्रहीत धरुन पंकजा मुंडे यांच्याकडून मराठा आणि मुस्लिम समाजाची मते आपल्या बाजुला कशी येतील यासाठी भेटीगाठी, बैठका घेण्याचा सपाटा सुरु आहे. तर बजरंग सोनवणे यांच्याकडून मुस्लिम, मागासवर्गीय, ओबीसीतील काही समाजांना आपल्या विचारधारेत आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला जात आहे. बीड मतदार संघात मराठा समाज अंदाजे ६ लाखाच्या पुढे आहे तर वंजारी समाज अंदाजे ४.५ लाखाच्या पुढे असून मुस्लिम अंदाजे २-३ लाख, धनगर समाज अंदाजे २-३ लाख, मागासवर्गीय समाज अंदाजे २ लाखाच्या पुढे, बंजारा समाज १ लाखाच्या पुढे आहे. या निवडणुकीत मुस्लिम समाजाच्या मतांवर मुंडे आणि सोनवणे यांचाही डोळा असल्याचे दिसते. धनगर आणि माळी समाज मुंडे यांच्यापासून दुर जाईल असे म्हटले जात असून सोनवणे यांच्याकडून या दोन समाजातील मतदारांना आपल्या पक्षाच्या विचारधारेत आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. तर पंकजा मुंडे यांच्याकडून मुस्लिम आणि मराठा समाजाला आपल्या बाजुने घेण्यासाठी जोरदार प्रयत्न केले जात असल्याचे समजते. यात त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना किती यश येते हे येणाऱ्या काळात कळणारच आहे.

---------------

### सुडाचे राजकारण कधीच

पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले. दिलेला शब्द पाळायचा ही पंडित आणि शिवछत्र परिवाराची परंपरा आहे. गेवराई तालुक्यातील १४ प्रकल्प येत्या एक वर्षात पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून मार्गी लागावेत ही अपेक्षा आहे असे झाले तर मुंडे परिवाराचे गेवराई तालुक्यावर खूप मोठे कर्ज राहील असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस तथा माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. दरम्यान भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना बीड जिल्ह्यात गेवराई मतदार संघातून सर्वाधिक मताधिक्य आम्ही मिळवून देऊ असा विश्वास बीड जि प चे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केला.

पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आज शहरात कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याला प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाला. याप्रसंगी व्यासपीठावर कृषिमंत्री धनंजय मुंडे, उमेदवार पंकजाताई मुंडे, माजी आ. अमरसिंह पंडित यांच्यासह अनिल तुरुकमारे, परमेश्वर वाघमोडे, मीनाक्षी पाटील, मुजीबभाई पठाण, सुनील पाटील, शरद चव्हाण, फुलचंद बोरकर, कुमारराव ढाकणे, विकास सानप, जगन्नाथ शिंदे, सुभाष नागरे, श्रीराम आरगडे, छगन पाटील आदी उपस्थित होते. पुढे बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, माझी निवडणूक तुम्हा सर्वांनी हाती घेतली आहे याचा मनोमन आनंद आहे. बीड जिल्ह्याचे भवितव्य घडवण्यासाठी ही निवडणूक अतिशय महत्त्वाची आहे. असून जिल्ह्यातील जनता विकासाच्या मुद्यावर आपल्या पाठीशी राहील. धनंजय मुंडे, अमरसिंह पंडीत, विजयसिंह पंडीत हे सर्वजण पंकजाताई लोकसभेच्या उत्तम उमेदवार आहेत हे सांगत माझ्यासाठी मत मागत आहेत. माझ्या प्रचाराची जबाबदारी तुम्ही सर्वजण खांद्यावर घेऊन ती यशस्वीरित्या पार पाडत आहात हे माझ्यासाठी खूप महत्वाचे प आहे असे सांगत त्या म्हणाल्या, पालकमंत्री म्हणून काम करत असताना मी कायम विकास केंद्रबिंदू ठेवले. माझ्या विरोधकांनाही मी कधीच त्रास दिला नाही की भेदभाव केला नाही. ही निवडणूक बीड जिल्ह्याचे भवितव्य ठरवणारी आहे, त्यामुळे तुम्ही सर्वजण मोठ्या मताधिक्याने मला निवडून द्या असे आवाहन यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केले.

**पंकजाताईंना सर्वाधिक मताधिक्य देणार-विजयसिंह पंडित**

कार्यकर्ता मेळाव्यात विजयसिंह पंडित म्हणाले, गेवराई मतदार संघातून जिल्ह्यात पंकजाताई मुंडे यांना सर्वाधिक मताधिक्य मिळवून देऊ.आम्ही सर्वजण लढणारे आहोत, मागे हटणारे नाहीत.देशात पुन्हा एकदा मोदीजींचे सरकार येणार हे निश्चित आहे, त्यामुळे बीड जिल्ह्यातून आपल्याला पंकजाताई मुंडे यांना सर्वाधिक मतांनी निवडून द्यायचे आहे, त्यासाठी अंग झटकून सर्व कार्यकर्त्यांनी कामाला लागावे. आपल्या एकजुटीतूनच पंकजाताई मुंडे यांचा ऐतिहासिक विजय होणार आहे असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

---------------

### कोयता दाखवून नेता होणाऱ्यानी

पार्टीचे धम्मापाल कांडेकर, अमोल करांडे, आम आदमी पार्टीचे अशोक येडे, शिवसेनेचे हनुमंत इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. गेवराई तालुक्यातील बाग पिंपळगाव, पिंपळगाव कॅम्प, गोपाळवस्ती (बेलगाव), बेलगाव, धोंडराई फाटा, धोंडराई, तळणेवाडी, भोजगव वस्ती, भोजगाव, बोरीपिंपळगाव, उमापुर, हिवरवाडी, महाडूळा फाटा, खळेगाव, वाहेवाडी, माटेगाव, कुंभेजळगाव, रामनगर तांडा, भाट अंतरवली या गावात मतदारांशी संपर्क साधत गाठीभेटी घेतल्या.

---------------

### हिवरा येथील लगड वस्तीवर

घटनास्थळी मौजे पिंपरखेड बिट चे वनरक्षक के.बी.विधाते मॅडम व त्यांचे सहकारी टिमचे एस.आर.शेख, के.आर.पवार,ए.डी.पाथरकर,यांनी पाहाणी केली असता बिबट्याचे पाऊल खुणावरुन कुत्रा मारल्याची खात्री केली व परिसरामध्ये बिबट्या आहे आसी खात्री केली व हिवरा-पिंपरखेड नागरीकांना सावधगिरी म्हणून रात्री,अपरात्री शेती मध्ये काम करत असताना सोबत टॉर्च बाळगावी,व मोबाइल वरती बिबट्या पर्यंत आवाज जाईल आसी गाणी लावावी,याची चाहूल लागताच बिबट्या आपली जागा सोडेल तसेच बिबट्याचा जास्तचा धोका निर्माण होऊ शकतो तर आशा वेळी वनखात्याच्या वरिष्ठ अधिकारी यांच्याशी संपर्क साधून बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी पिंजर्याची मागणी करुण बिबट्याचा बंदोबस्त केला जाईल.असे मौजे.पिंपरखेड बिट चे वनरक्षक विधाते मॅडम यांनी केली आहे.

-----------

### दोन महिन्यांनंतर शिंदे दिसणार

असा पंतप्रधान नको आहे. गोधरानंतर मणीपूरमध्ये अत्याचार झाले. आता हे सरकार पुन्हा आल्यास देशाचा नकाशाच बदलेल, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. दिल्लीमध्ये शेतकरी आंदोलन करीत आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यास मोदी कुचकामी ठरले आहेत, असेही ते म्हणाले.

---------

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....



## ब्रज्वल कासटचे 'सीएफए' परिक्षेत यश

बीड । प्रतिनिधी

अमेरिकेतील सीएफए संस्थेद्वारे घेण्यात येणाऱ्या चार्टर्ड फायनान्सियल अनॉलिस्ट परीक्षेत बीड येथील उद्योजक राजेश कासट यांचा मुलगा ब्रज्वल याने यश मिळविले आहे. या परिक्षेचा तिसर्या वर्षाचा निकाल नुकताच जाहीर झाला असून त्यात ब्रज्वलने यश मिळविले.



सीएफ ही विद्याशाखा वित्तीय व्यवस्थापनांत महत्त्वाची मानली जाते. त्यात ब्रज्वल कासट यांनी मिळवलेल्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. ब्रज्वल कासट याचे वडील राजेश कासट हे बीडमधील प्रसिद्ध उद्योजक असून त्यांनी सुरूवातीपासूनच ब्रज्वलच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले होते. ब्रज्वल कासट यांनी देखील विशेष मेहनत घेऊन हे यश मिळविले. याबद्दल ब्रज्वलचे सर्वत्र स्वागत होत असून त्याचे माहेश्वरी सभेचे सचिव सत्यनारायण सारडा, सी.ए. गोपाल कासट, विष्णुदास बियाणी, जयप्रकाश कलंत्री, जुगलकिशोर लोहिया, गोविंद बजाज यांच्यासह राजेश कासट यांचे मित्र कंपनी संजय लड्डा, शाम चांडक, प्रविण तोष्णिवाल यांच्यासह माहेश्वरी समाजातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# ज्ञान आणि कलेमुळे जीवन आनंदी व समृद्ध होते - डॉ.राजेश इंगोले

## स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर येथे पारितोषिक वितरण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

रंगोत्सव सेलिब्रेशन, मुंबई तर्फे घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये स्वामी विवेकानंद शाळेतील विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर यश मिळवत भरघोस बक्षिसे पटकावली. स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर, अंबाजोगाई येथे इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी बक्षीस वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून येथील सुप्रसिध्द मानसोपचार तज्ज्ञ तथा इंडीयन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सहसचिव व सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ.राजेश इंगोले यांनी विद्यार्थ्यांना उपयुक्त मार्गदर्शन केले.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवक्षितिज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून नवक्षितिज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेच्या सचिव स्वरूपाताई दिग्रसकर, स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिरच्या प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका दिपालीताई जाधव उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरूवात प्रतिमा पूजन व दीपप्रज्ज्वलनाने करण्यात आली. पाहुण्यांचे यथोचित स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करीत असताना स्वरूपाताई यांनी शाळेच्या प्रगतीचा आलेख मांडला. तसेच शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच विविध उपक्रम राबवित असते असे मत व्यक्त केले. रंगोत्सव सेलिब्रेशन तर्फे घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर बक्षीस मिळवलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे प्रमुख अतिथी डॉ.राजेश इंगोले व इतर मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन कौतुक करण्यात आले. यामध्ये कलरिंग, हॅन्ड रायटिंग, थम्ब पेंटिंग, कोलाज मेकिंग अशा विविध स्पर्धांचा समावेश होता. यावेळी प्रमुख अतिथी डॉ.राजेश इंगोले यांनी आपल्या बालपणीच्या शालेय आठवणींची सांगड घालत आपल्या अनोख्या शैलीत विद्यार्थ्यांशी हितगुज साधले तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे तथा त्यांना घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या संतोष कुलकर्णी व स्वरूपाताई कुलकर्णी यांचेही मनःपूर्वक कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या जीवनातील बहुतांश वेळ शाळेत व शिक्षकांसोबत व्यतीत होत असल्याने त्याला घडवण्याची मोठी जबाबदारी शिक्षकांवर आहे. त्यांच्यात असलेल्या सुप्तगुणांना ओळखून त्यांना वाव देण्याचे प्रयत्न शिक्षकांनी करावेत अशी अपेक्षा सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप करताना संतोष कुलकर्णी यांनी ही विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अंबिकाताई रामदासी यांनी केले. तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेच्या सर्व कर्मचारीवृंद व शिक्षकांनी पुढाकार घेतला

## नेकनूर येथील कालिका देवी यात्रा उत्सवाला आजपासून सुरुवात

नेकनूर । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील कासार समाजाचे आराध्य दैवत असणाऱ्या श्रीकालिंका देवी यात्रा उत्सवाला शनिवार ता . २० पासून सुरूवात होणार आहे . शनिवार ता . २० ते मंगळवार ता . २३ पर्यंत हा उत्सव चालणार आहे. कालिंका देवी यात्रेमध्ये भरगच्च धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून दररोज सकाळी ६ ते ७ सप्तशती पाठ, आरती , दुपारीभजन व सायंकाळी ६ ते ७ आरती व नैवेद्यअसे धार्मिक कार्यक्रम आहेत. सोमवार ता . २२ रोजी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम रात्री ९ वाजता होणार आहे. भागवताचार्या अनुराधा (दीदी) शेटे पंढरपूर यांची देवी महात्म्य कथा दररोज होणार आहे . मंगळवार ता . २३ रोजी कालिका देवी संस्थान ची वार्षिक सर्वसाधारण सभा दुपारी १२ वाजता होणार असून या सभेला अध्यक्ष म्हणून अखिल भारतीय कासार समाज अध्यक्ष शरद दामोधरराव भांडेकर हे उपस्थित राहणार आहेत . यामध्ये कासार समाजाची दिशा व दशा याविषयी चर्चा व नेकनूर संस्थानच्या वार्षिक कामकाजाचा आढावा घेतला जाणार आहे . यावेळी समाजातील मान्यवरांचे सत्कार करण्यात येणार आहेत . मंगळवारी यात्रेचा शेवटचा दिवस असून रात्री १० वाजता श्री कालिंका देवीच्या छबिण्याची मिरवणूक निघणारआहे .या यात्रा उत्सवात दररोज कालिंका देवीच्या नवीन मंदिरापासून जुन्या मंदिरापर्यंत नैवेद्य वाजत गाजत नेला जातो. यावेळी भाविक मोठ्या संख्येने हजर असतात .महाराष्ट्रात अत्यल्प असणाऱ्या कासार समाजासाठी ही यात्रा म्हणजे एक पर्वणीच असते . या ठिकाणी पाहुणेरावळ्यांच्या भेटीगाठी,नातीगोती , समाजाची चर्चा याचबरोबर धार्मिक कार्यक्रम सुद्धाआयोजित केले जातात. या यात्रा उत्सवाला जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन कालिका देवी संस्थानचे अध्यक्ष श्री शिवाजीराव काटकर व सचिव ॲड .भानुदास सोनाजी राव पाटील व कालिका देवी संस्थांनच्या वतीने करण्यात आले आहे.

## नाळवंडी येथील प्रसिद्ध देवस्थान संगमेश्वराच्या चरणी नतमस्तक होऊन माळी समाजाचे नेते संतोष रासवे यांनी फोडला प्रचाराचा नारळ

**माजलगाव । प्रतिनिधी**

सर्व ओबीसी,माळी समाजाचा व महाराष्ट्र राज्य सावता सेना यांच्या आग्रहास्तव संतोष रासवे यांनी आज नाळवंडी येथील प्रसिद्ध असलेले देवस्थान श्री संगमेश्वर यांच्या चरणी नतमस्तक होऊन आपल्या लोकसभा प्रचाराचा नारळ फोडला यावेळी महाराष्ट्र राज्य सावता सेना खंबीरपणे संतोष रासवे यांच्या पाठीशी उभा राहील त्यांना मन धनाने काम करून माळी समाजाचा नेतृत्व संसदेत पाठवण्यासाठी काम करेल असे मत अमोल राऊत यांनी व्यक्त केले.



यावेळी पुढे बोलताना राऊत म्हणाले की महाराष्ट्रभर मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आंदोलनामुळे ओबीसी मराठा वाद पेटला यावेळी ओबीसी समाजाकडे सरळ सरळ दुर्लक्ष करत पंकजा ताई मुंडे यांनी ओबीसी समाजासह माळी समाजावर अन्याय केला महाराष्ट्रातील कुठल्याच आंदोलनात पंकजा मुंडे उपस्थित राहिल्या नाहीत यामुळे सर्व ओबीसी सह माळी समाज नाराज आहे धनंजय मुंडे,पंकजा मुंडे ओबीसी वर अन्याय होताना गप राहतात मतदान मागण्याचा यांना कवडीचाही अधिकार नाही असेही अमोल राऊत यांनी सांगितले ओबीसी समाजाचे स्वतःला नेते म्हणून घेताय जिल्ह्यात मात्र तुमच्या मर्जीतील अधिकारी ठेवतात असा प्रश्नही माळी समाजातून उपस्थित केला जात आहे पंकजाताई आपण ओबीसी वरचे बेगडी प्रेम दाखवून समाजाला वेठीस धरू नका, त्यामुळे यावेळी माळी समाजाने ठरवले आहे आपला स्वतंत्र नेतृत्व संसदेत पाठवायचं म्हणजे पाठवायचच असा निश्चय, माळी समाजासह, धनगर, वंजारा, साळी, कोळी, दलित, बांधवांनी ठरवले आहे त्यामुळे संतोष रासवे यांचा विजय निश्चित आहे असे अमोल राऊत यांनी बोलताना सांगितले.

## चिंचगव्हाण येथील हरिनाम सप्ताहाची भव्यदिव्य सांगता

माजलगाव। प्रतिनिधी

शहरापासून जवळच असलेल्या चिंचगव्हान येथील अखंड हरीनाम सप्ताहाची सांगता मोठ्या दिमाकदार व भव्यदिव्य स्वरूपात काल झाली

तालुक्यातील मौजे चिंचगव्हान येथे मागच्या अनेक वर्षांपासून या अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन गावकऱ्यांच्या वतीने केले जाते या वर्षी ह भ प परमेश्वर महाराज कुरे यांचे मार्गदर्शन लाभले सप्ताहाचे हे १४ वे वर्ष आहे

दि ११ ते १८ एप्रिल दरम्यान या अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते या दरम्यान महाराष्ट्रातील अनेक नामवंत महाराजांचे कीर्तन या ठिकाणी झाली तर वृंदावन धाम येथील प्रसिद्ध कथाकार



भागवताचार्य आकाश महाराज शास्त्री यांच्या श्री मुखातून ही कथा ऐकताना भाविक भक्त अक्षरशः तल्लीन होऊन कथा श्रावण करत असत काल या कथेची सांगता झाली या वेळी गावातील महिला , मुली ,ग्रामस्थांनी पारंपरिक वस्त्र परिधान करून वाजत गाजत संपूर्ण गावातून ग्रंथ दिंडीत काढण्यात आली

या दरम्यान भव्य अश्या फुगडी चा आनंद गावातील सर्वांनी घेतला. मागच्या दोन वर्षा पासून या अखंड हरीनाम सप्ताहाची जबादारी ही महिलांनी घेतली आहे सर्व नियोजन या महिलांच करतात हे विशेष आहे यात मंगलताई जाधव , मैनाबाई देशमुख , द्वारकाबाई होनमाणे , सखुबाई उगले , राहीबाई मुरूमकर ,विमलबाई होनमाणे ,कडूबाई कोकाटे , वैजेंता घोलप, आदींनी पुढाकार घेऊन हा साप्ता यशस्वी रित्या पार पाडला तर काल चे संपूर्ण अन्नदान विनायक धोंडीराम उगले यांनी दिले.

## पं.अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांनी घेतले ज्योतिर्लिंग वैद्यनाथाचे दर्शन

परळी । प्रतिनिधी

भागवत भूषण तथा सुप्रसिद्ध ज्योतिषाचार्य प.अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांनी आज शुक्रवार दि.१९ रोजी देशातील पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथांचे दर्शन घेतले.यावेळी त्यानी वैद्यनाथाला विधिवत रुद्राभिषेक केला.नंतर भगरे गुरुजींचे शहरात विविध ठिकाणी जल्लोषात स्वागत केले गेले.

प.भगरे गुरुजी यांनी प्रभू वैद्यनाथाला सपत्नीक रुद्राभिषेक व आरती केली.यावेळी रंग माझा वेगळा या मालिकेत भूमिका साकारणारी त्यांची कन्या अनघा भगरे हीने देखील प्रभू वैद्यनाथाची पूजा केली.या अभिषेकाचे पौरोहित्य पुरुषोत्तम चोथवे,दत्तात्रय जोशी यांनी केले.दरम्यान वेध भविष्याचा या कार्यक्रमाच्या माध्यमातून अनेकांच्या भविष्याचा अचूक वेध घेणारे भगरे गुरुजी




यांच्यासोबत अनेकांना फोटो काढण्याचा मोह आवरला नाही.

काळाराम मंदिर,धरणीधर विठ्ठल मंदिरात गुरुजींनी घेतले दर्शन

श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग दर्शनानंतर भगरे गुरुजी यांचे अंबेवेस मधील श्री काळारामाचे दर्शन घेतले यावेळी प्रताप धर्माधिकारी,गणेश टिंबे,चारुदत्त करमाळकर,विशाल ताथोडे,दयानिधी खिस्ते,प्रशांत पोहनेरकर यांनी शाल श्रीफळ देऊन स्वागत केले.तद्नंतर एकादशी निमित्त धरणीधर वाडा येथील विठ्ठलरुक्मिणी मंदिरात जाऊन दर्शन घेतले.

## विद्यार्थी प्रभावीपणे मतदारांमध्ये मतदान जनजागृती करु शकतात - प्राचार्य राऊत

वडवणी । प्रतिनिधी

जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी बीड यांच्या आदेशानुसार वडवणी शहरातील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये मतदार जनजागृती रॅली व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी. तर प्रमुख मान्यवर म्हणून उपप्राचार्य ए.आर.मस्के, पर्यवेक्षक धाईतिडक पी.एम., श्रीमती.शोभाताई आंधळे मॅडम उपस्थित होत्या.



याप्रसंगी श्रीमती.शोभाताई आंधळे आपले विचार व्यक्त करतांना त्या म्हणाल्या की, लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये आपल्या पालकांनी सक्रिय सहभाग घेवून निष्पक्षपणे मतदान करावे. जे विद्यार्थी प्रथमच मतदान करणार आहेत त्यांनी जबाबदारीने मतदान करुन बीड जिल्ह्याचा खासदार लोकसभेत प्रतिनिधी म्हणून पाठवावा. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य राऊत सर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाले की, निवडणुका म्हणजे लोकशाहीचा उत्सव आहे. आणि या उत्सवामध्ये सर्व मतदारांनी मतदान केंद्रावर जावून आपला मतदानाचा हक्क बजावायला हवा. वडवणी येथील कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांना असे वाटते की, मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या माध्यमातून मतदारांमध्ये प्रभावीरित्या मतदान जनजागृती होवू शकते. म्हणून वडवणी तालुक्यातील प्रत्येक शाळेमध्ये, महाविद्यालयामध्ये मतदार जनजागृतीचे कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. आपल्या घरातील प्रत्येक मतदाराला मतदान केंद्रापर्यंत नेण्याचं काम तुम्ही करावे असे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मतदार शपथ देवून कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे उपप्राचार्य मस्के सर यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.अंडील जी.पी. यांनी केले. कार्यक्रमाचे आभार पर्यवेक्षक धाईतिडक सर यांनी मानले. यानंतर मतदार जनजागृती रॅलीला प्रारंभ झाला. मतदार जनजागृतीचे घोषवाक्यांचे फलक हातात घेवून घोषणा देवून विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृती रॅलीतून मतदारांमध्ये जनजागृती केली. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## ज्येष्ठ विचारवंत डॉ.उदय निरगुडकर यांचे व्याख्यान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

ज्येष्ठ विचारवंत तथा पत्रकार डॉ.उदय निरगुडकर यांचे रविवार २१ एप्रिल रोजी आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह येथे सायंकाळी सहा वाजता ''विश्वगुरु भारत'' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.डॉ. उदय निरगुडकर हे महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत व पत्रकार म्हणून सर्वत्र परिचित आहेत. राज्यभर विविध विषयांवर त्यांची व्याख्याने सुरूच असतात. अंबाजोगाईत ही युवकांना प्रेरणा मिळावी.नव्या भारताची नवीन राष्ट्र म्हणून निर्माण झालेली ओळख. या विषयावर त्यांचेई व्याख्यान होणार आहे. या व्याख्यानासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन येथील भारतीय जैन संघटना,, वसुंधरा सेवा प्रतिष्ठान, दीनदयाळ नागरी सहकारी बँक, अस्तित्व महिला संघटन, घुगे हार्ट अँड क्रिटिकल केयर हॉस्पिटल यांनी केले आहे.



# पोषण आहार व आरोग्य यावर अंगणवाडी सेविका व आशा ताई यांचे एक दिवशीय प्रशिक्षण

### या प्रशिक्षणास १८ गावातील एकूण ८४ अंगणवाडी सेविका व आशा ताई यांची उपस्थिती

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

उसतोड कामगार यांचे आरोग्य सुधारण्यासाठी व त्यांचे नियमित ट्रकिंग करण्यासाठी आशाताई आणि अंगणवाडी सेविका घेणार पुढाकार.

प्रतिनिधी मराठवाडा ग्रामीण विकास संस्था छत्रपती संभाजीनगर ही संस्था सोसायटी व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व १९६० अंतर्गत नोंदणी संस्था असून १९९६ पासून छत्रपती संभाजी नगर, जालना, नाशिक अहमदनगर बीड व इतर जिल्ह्यांमध्ये पाणी व जलसंधारण याच्यावर प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम गुणवत्ता पूर्व बाल शिक्षण प्रकल्प, तंबाखू नियंत्रण प्रकल्प, आरोग्यवर आधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया, चाइल्ड हेल्पलाईन १०९८, कोविड-१९ लसीकरण, नियमित लसीकरण इत्यादी कार्यक्रमाचे छत्रपती संभाजीनगर सह १८ जिल्ह्यामध्ये सहभागातून कार्य करत आहे. स्थलांतरित ऊसतोड कामगारांना पुरेशे अन्न आणि आरोग्य सेवा मिळवून देण्यासाठी संस्थेमार्फत छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील कन्नड व पैठण बीड जिल्ह्यातील धारूर व केज आणि जालना जिल्ह्यातील घनसांगी व परतुर ह्या तालुक्यातून स्थलांतरित ऊसतोड कामगारांचे आरोग्य व आहार शिक्षणाचा दर्जा वाढवण्यासाठी तसेच ऊस तोडणी दरम्यान त्यांचे सुरक्षित स्थलांतर करणे या विषयावर संस्था ऊसतोड कामगारा बरोबर काम करत आहे.

आज धारूर तालुक्यतील उसतोड कामगार १८ गावातील अंगणवाडी ताई आणि आशा ताई यांचे पोषण आहार व आरोग्य समिती व गावातील पोषण आहाराबद्दल घ्यावयाची काळजी यावर एक दिवसीय प्रशिक्षण संपन्न झाले. या प्रशिक्षणाच्या अध्यक्षस्थानी एच पी देशमुख प्रमुख उद्धाटक अनिलजी महाजन - सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार, प्उरकल्पप संचालक अप्पासाहेब उगले, प्रमुख प्रशिक्षक डॉ. हनुमंत सौदागर. क र्यक्रमाचे प्रमुख उद्धाटक अनिलजी महाजन यांनी ऊसतोड कामगार हे संघटित होणे गरजेचे आहे त्यांचे संघटन झालं तर त्यांना स्व. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाच्या विविध योजनेचा लाभ होईल. मुळातच उसतोड कामगार हा वंचित घटक आहे. या घटकावर आजपर्यंत कोणीही काम केले नाही. धारूर तालुक्यातील ८० टक्के कुटुंब हे ऊसतोड कामगार आहेत जास्तीत जास्त कर्नाटक व पश्चिम महाराष्ट्रात स्थलांतर होतात हे स्थलांतर होत असताना त्यांनी काय काय काळजी घ्यायला हवी त्यांनी आरोग्याबाबत कशी देखरेख करायला हवी. याबाबत अंगणवाडी व आशा ताई यांना सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकल्प समन्वयक संतोष रेपे गाव स्वयंसेवक प्रकाश काळे, सुनीता विभुते, शिवशंकर माने, राज करे, निवेदिता गवळी व प्रकल्प लेखापाल अक्षय सिद्धवाल यांनी मोलाचे परिश्रम घेतले.



cmyk

# अवकाळीच्या संकटामुळे कांदा काढणीला वेग!

पुणे : हवामान विभागाने अवकाळीचा इशारा दिल्याने कांदा काढणीस वेग आलेला आहे. शेतकऱ्यांना कांद्याची शेती करताना मॉन्सूनची अनियमितता, त्यामुळे निर्माण झालेला दुष्काळ, कांदा रोपांची टंचाई, रासायनिक खतांचे वाढलेले दर, भरमसाट मजुरी, विजेचा लपंडाव, कांदा निर्यात बंदी या सर्व समस्येला सामोरा जावे लागते. तरीही बळीराजाने चांगल्या दराच्या अपेक्षेने कांद्याची लागवड केली. या सर्व संकटावर मात करीत कांदा पीक काढण्यास आले असतानाच हवामान विभागाने अवकाळीचा इशारा दिल्याने शेतकरी सध्या भर उन्हात कांदा काढणीच्या कामात गुंतला आहे.

यंदाच्या रब्बी हंगामातील कांद्याला लागवडीपासूनच अनेक संकटांचा सामना करावा लागला आहे. सर्व संकटांवर मात करीत कांदा पीक आजमितीला काढणीस आले आहे. त्यातच अवकाळीचे संकट आल्याने शेतकऱ्यांना लवकरात लवकर कांदा काढणी शिवाय पर्याय नाही. नाहीतर पावसाच्या तडाख्यात सापडून संपूर्ण पीक नष्ट होऊ शकते. शेतकऱ्यांसाठी इकडे आड तर तिकडे विहीर यासारखी परिस्थिती उद्भवली आहे.

उन्हाचा तडाखा वाढत असताना शेतकऱ्यांना



कांदा काढावा लागत आहे. मागील वर्षी याच दिवसांत प्रचंड गारपीट झाल्याने रब्बी हंगामातील कांदा पीक नेस्तनाबूत झाले होते. भांडवलसुद्धा निघाले नसल्याने कांदा उत्पादक शेतकर्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागला होता.

चालू वर्षी तालुक्यात अत्यल्प पर्जन्यमानामुळे सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. बारमाही पाणी असलेल्या विहिरींनी मार्चच्या शेवटी तळ गाठण्यास सुरुवात केली. चालू हंगामात कांदा रोपांच्या टाकण्याच्या वेळी अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणावर हजेरी लावली होती. याचा परिणाम कांदा रोपांच्या उतरणीवर झाला. यामुळे चालू रब्बी हंगामात कांदा रोपांचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला. कांदा लागवड पूर्ण करण्यासाठी बळीराजांनी सोन्याच्या दरात कांदा रोप खरेदी करून कांदा लागवड केली. रोपांच्या अकल्पित टंचाईमुळे यंदाच्या हंगामात कांदा लागवड ही जानेवारी महिन्यापर्यंत सुरू होती.

## मजुरांची टंचाई

पाणी टंचाई व वाढत्या उन्हाच्या प्रकोपामुळे कांदा पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढला असून, येणाऱ्या उत्पादनात घट निर्माण झाली आहे. त्यातच दरवर्षी बाहेरील मजूर कांदा काढणीसाठी डेरेदाखल होत असतात. यावर्षी सर्वत्र दुष्काळाच्या झळा बसत असल्याने मोठ्या प्रमाणावर मजूर हजेरी लावतील, असा अंदाज बळीराजांकडून बांधला जात होता; पण अद्याप पर्यंत पाहिजे त्या प्रमाणात मजूर उपलब्ध होत नसल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

# दिन विशेष

## महत्वाच्या घटना

१६५७ : न्यूयॉर्कमधील ज्यू व्यक्तिंना धर्मस्वातंत्र्य देण्यात आले.
१७१३ : मुघल शासक जहांदार शाह दिल्लीच्या गाद्दीवर बसले.
१७७० : प्रसिद्ध दर्यावर्दी सागर संशोधक कॅप्टन जेम्स कूक यांनी ऑस्ट्रेलिया खंडाचा शोध लावला.
१७७७ : न्यूयार्कने ब्रिटन देशाकडून आपल्या स्वता:च्या स्वातंत्र्याची घोषणा करून एक स्वतंत्रित राज्याच्या रूपाने आपले नवीन संविधान स्वीकारले.
१९३९ : ॲडॉल्फ हिटलरचा ५० वा वाढदिवस जर्मनीमध्ये सार्वजनिक सुटी देऊन साजरा करण्यात आला.
१९४० : आरसीए द्वारा पहिला इलेक्ट्रोनिक्स माईक्रोस्कोप दाखवण्यात आला होता.
१९४५ : दुसरे महायुद्ध  अमेरिकन फौजांनी लाइपझिग शहराचा ताबा घेतला.
१९४६ : राष्ट्रसंघ ही संस्था बरखास्त करून पुढे याचेच संयुक्त राष्ट्रांच्या संघटनेमध्ये रूपांतर झाले.
१९९२ : खगोलशास्त्राच्या अभ्यासासाठी जगातील सर्वात मोठी व भारतातील पहिली अँटेना पुणे जिल्ह्यातील नारायणगाव जवळील खोडद येथे उभारली गेली.
१९९७ : भारतीय क्रांतिकारक व राजनेता इंद्रकुमार गुजराल भारताचे १२ वे पंतप्रधान बनले.
२००८ : डॅनिका पॅट्रिक ह्या इंडी कार रेस जिंकण्याच्या पहिल्या महिला चालक झाल्या.
२०११ : भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) ने आपल्या उपग्रह प्रक्षेपण वाहन ‘पीएसएलव्ही’  च्या साह्याने तीन उपग्रह यशस्वीपणे अवकाशात पाठवले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

५७० : मोहम्मद पैगंबर, इस्लाम धर्माचा संस्थापक.
७८८ : आद्य श्री शंकराचार्य यांचा जन्म
१७४९ : मराठा सत्तेचा ध्वज अटकेपार नेणार्या पेशव्यांचे श्रद्धास्थान असलेल्या देवदेवेश्वर मंदिराची नानासाहेब पेशवे यांनी पर्वतीवर स्थापना केली.
१८०८ : फ्रान्सचे पहिले अध्यक्ष नेपोलियन (तिसरे) यांचा जन्म. (मृत्यू: ९ जानेवारी १८७३)
१८७० : पाकिस्तानी विद्वान आणि भाषाशास्त्रज्ञ तसचं, उर्दू भाषेचे जनक मौलवी अब्दुल हक यांचा जन्मदिन.
१९३९ : ध्रुपद गायक सईदुद्दीन डागर यांचा जन्म.
१८८९ : साली जर्मन शासक व ‘राष्ट्रीय समजवादी जर्मन कामगार पक्ष’ नेता एडोल्फ हिटलर यांचा जन्मदिन.
१८९६ : सार्थ ज्ञानेश्वरी चे लेखक प्रा. ह. भ. प. शंकर वामन उर्फ सोनोपंत (मामासाहेब) दांडेकर यांचा माहीम, ठाणे येथे जन्म. (मृत्यू: ९ जुलै १९६८)
१८९७ : भारतीय वैदिक अभ्यासक, इंडोलॉजिस्ट पंडित सुधाकर चतुर्वेदी यांचा जन्मदिन.
१९१४ : गोपीनाथ मोहांती, उडिया लेखक.
१९२० : पद्मश्री पुरस्कार प्राप्त भारतीय भजन गायिका ज्योतिका रॉय यांचा जन्मदिन.
१९२४ : हिंदी साहित्याचे प्रसिद्ध समीक्षक आणि पीपल्स राइटर्स असोसिएशनचे संस्थापक व सरचिटणीस चंद्रबली सिंह यांचा जन्मदिन.
१९५० : एन. चंद्रबाबू नायडू, आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री.
१९६५ : मेघालय राज्याचे माजी मुख्यमंत्री व मेघालय राज्यातील विधानसभेचे विद्यमान विरोधी पक्षनेते मुकुल एम. संगमा यांचा जन्मदिन.
१९६६ : याहू चे सहसंस्थापक डेव्हिड फिलो यांचा जन्म.
१९८० : भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक अरीन पॉल यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१२ : गॉथिक भयपट कादंबरी ड्रेकुलासाठी प्रख्यात असलेले आयरिश लेखक अब्राहम ‘‘ब्रैम’’ स्टोकर यांचे निधन.
१९१८ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन भौतिकशास्त्रज्ञ कार्ल ब्राऊन यांचे निधन. (जन्म: ६ जून १८५०)
१९३८ : न्यायाधीश व कायदेपंडित चिंतामणराव वैद्य यांचे निधन. (जन्म: १८ ऑक्टोबर १८६१)
१९६० : सुप्रसिध्द बासरीवादक पन्नालाल घोष.
१९७० : गीतकार आणि शायर शकील बदायूँनी याचे निधन. (जन्म: ३ ऑगस्ट १९१६  बदायूँ, उत्तर प्रदेश)
१९६८ : सुप्रसिध्द भारताचार्य चिंतामणराव विनायक वैद्य.
१९९९ : रुचिरा पुस्तकाच्या लेखिका कमलाबाई कृष्णाजी ओगले याचे निधन. (जन्म: १६ सप्टेंबर १९१३)
२००२ : राधाकृष्ण: एक जीवनी आणि जवाहरलाल: एक जीवानीचे लेखक व प्रसिद्ध भारतीय इतिहासकार सर्वपल्ली गोपाल यांचे निधन.
२००४ : भारतीय पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय लोक कलाकार आणि शास्त्रीय गायक कोमल कोठारी यांचे निधन.

# कोणत्या महिन्यात कोणत्या पिकांची लागवड करावी



शेतीतून अधिक नफा मिळविण्यासाठी शेतकरी त्यांच्या शेतात अनेक प्रकारची पिके घेतात. जेणेकरून त्यांना बाजारात विकून चांगला नफा मिळू शकेल. कोणत्या महिन्यात कोणता भाजीपाला पिकवायचा याची माहिती घेणे आवश्यक आहे. जेणेकरून शेतकऱ्याला अल्पावधी शेतीतून भरघोस उत्पन्न मिळू शकेल. शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या महिन्यात या भाज्यांची लागवड करावी एप्रिल महिना : या महिन्यात शेतकरी त्यांच्या शेतात फक्त दोन प्रकारच्या भाजीपाल्याची लागवड करू शकतात. जसे की राजगिरा आणि मुळा लागवड करता येते. मे महिना : शेतकरी मे महिन्यात त्यांच्या शेतात फुलकोबी, वांगी, कांदा, मुळा आणि मिरचीची लागवड करू शकतात.

जून महिना : जून महिन्यात देशातील शेतकरी त्यांच्या शेतात फ्लॉवर, काकडी, चवळी, कडबा, पेठा, सोयाबीन, भेंडी, टोमॅटो, कांदा, राजगिरा आणि कस्टर्ड सफरचंदाची लागवड करू शकतात. या दिवसांत या भाज्यांचे उत्पन्न चांगले येते. जुलै महिना : शेतकरी या महिन्यांत काकडी, चवळी, कारले, करवंद, कडबा, पेठा, भेंडी, टोमॅटो, राजगिरा आणि मुळा या सुधारित जातींची लागवड करून चांगले उत्पन्न मिळवू शकतात. ऑगस्ट महिना : ऑगस्ट महिन्यात शेतकरी त्यांच्या शेतात गाजर, सलगम, फ्लॉवर, बीन, टोमॅटो, काळी मोहरी, पालक, कोंथिबीर आणि राजगिरा या जातीची लागवड करू शकतात. यावेळी चांगले उत्पादन मिळते. सप्टेंबर महिना : शेतकऱ्यांनी आपल्या शेतात भाजीपाल्यापासून अधिक उत्पन्न मिळवण्यासाठी गाजर, सलगम, फ्लॉवर, बटाटे, टोमॅटो, काळी मोहरी, मुळा, पालक, कोबी, कोथिंबीर एका जातीची बडीशेप आणि ब्रोकोली यांची लागवड सप्टेंबर महिन्यात करावी. ब्रोकोलीच्या जातींची लागवड करता येते. हे सर्व सप्टेंबर महिन्यात चांगले उत्पादन देतात. ऑक्टोबर महिना : शेतकऱ्यांसाठी ऑक्टोबर महिना खूप खास असतो. कारण या महिन्यात शेतकरी आपल्या शेतात अनेक प्रकारच्या भाज्यांची लागवड करू शकतात. जसे की गाजर, सलगम, फुलकोबी, बटाटे, टोमॅटो, काळी मोहरी, मुळा, पालक, कोबी, कोहिराबी, धणे, राजमा, मटार, ब्रोकोली, वांगी, कांदे, ब्रुसेल्स स्प्राउट्स या सुधारित जातींची लागवड. लसणाच्या वाणांचे चांगले उत्पादन मिळू शकते, ज्याला बाजारात मागणी जास्त आहे. नोव्हेंबर महिना: या महिन्यात बीटरूट, सलगम, फ्लॉवर, टोमॅटो, काळी मोहरी, मुळा, पालक, कोबी, सिमला मिरची, लसूण, कांदा, वाटाणे आणि धणे या जातीची लागवड करता येते. डिसेंबर महिना: शेतकरी डिसेंबर महिन्यात त्यांच्या शेतात टोमॅटो, काळी मोहरी, मुळा, पालक, कोबी, कांदा आणि वांगी यांच्या सुधारित जातींची लागवड करू शकतात.

# कोंबड्यांमध्ये वाढतोय उष्माघात? जाणून घ्या लक्षणे, करा हे उपाय!

सध्या महाराष्ट्रात उष्णतेची लाट सुरू आहे. माणसांप्रमाणे जनावरांना सुद्धा या उष्णतेचा फटका बसत आहे. विशेषतः कोंबड्यांमध्ये उष्माघाताची लक्षणे आढळतात. पुढील काही महिने कोंबडी पालन व्यवस्थापनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. उन्हाळ्यात मांसल कोंबड्यांची चढ्या दराने विक्री होते. परंतु उन्हाचा ताण सहन न करू शकल्याने अंडी, मांस उत्पादनात घट दिसून येते.

कोंबड्यांच्या योग्य वाढीसाठी १८ ते २१ अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते परंतु ते २८ ते ३० अंश सेल्सिअस पर्यंतचे तापमान सहन करू शकतात. परंतु ३० अंश सेल्सिअसच्या वरती तापमान गेल्यास त्याचा त्यांच्या उत्पादन आणि प्रजोत्पादनावर विपरीत परिणाम होतो. बाह्य तापमान ३५ अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास प्रति अंश सेल्सिअस तापमान वाढीने ५ टक्के उत्पादन घट होते. जास्त तापमानात कोंबड्यांमध्ये खालील प्रमाणे उष्माघाताची लक्षणे आढळतात.

उष्माघाताची लक्षणे : कोंबड्या तोंडावाटे श्वास घेतात, तोंडाची उघडझाप करून धापा टाकतात त्वचा रखरखीत होते, रंगामध्ये बदल दिसून येतो. पाणी जास्त पितात. भूक मंदावते. पोट जमिनीला घासतात, डोळे बंद करतात, हालचाल मंदावते, सुस्त राहतात. अंडी उत्पादनात घट होते, अंड्याचे वजन कमी होते. अंड्याच्या बाहेरील कवचाची गुणवत्ता कमी होते. शारीरिक वजनात लक्षणीय घट होते, मांसल कोंबड्यांचे वजन कमी होते. प्रजोत्पादन यावर उष्णतेचा विपरीत परिणाम होतो. रोगप्रतिकार शक्तीही कमी होते, त्यामुळे आजारास बळी पडतात. खाद्याचे मांसात वा अंड्यात रूपांतर क्षमता कमी होते. कोंबड्या भिंतीच्या आडोशाला पडून राहतात. काही कोंबड्या पिण्याच्या पाण्याच्या भांड्याजवळ थंड जागेत मान वाकवून बसतात. शरीराचे तापमान कमी करण्यासाठी व शरीरात थंडपणा आणण्यासाठी पंख शरीरापासून दूर पसरवितात. दीड किलो पेक्षा अधिक वजनाच्या कोंबड्यांना दुपार ते संध्याकाळच्या वेळी ताप येतो. लालसर होऊन मरतात.

उपाय योजना :

शेड बांधताना घराची लांबी पूर्व-पश्चिम ठेवावी. वायुवीजन व्यवस्था सक्षम असावी. उन्हाळ्यात गादीसाठी लाकूड भुश्याऐवजी भाताचे तूस किंवा भुईमुग टरफलांचा वापर करावा. गादी म्हणून वापरात येणार्या तूसाची जाडी कमी (१ ते १.५ इंच) करावी. कोंबड्यांची संख्या किमान १० टक्क्यांनी कमी करावी. थंड, स्वच्छ, ताजे पिण्यायोग्य पाणी मुबलक प्रमाणात पुरवावे. पिण्याच्या पाण्याची भांडी संख्या दुप्पट वाढवावी. पिण्यासाठी क्लोरीनयुक्त पाण्याचा वापर करावा. यामुळे पाण्यातून होणारे आजार टाळता येतील. पिण्याच्या पाण्यामधून जीवनसत्व (क, ई), सेलेनीअम यांचा वापर करावा. त्यामुळे उष्णतेचा ताण कमी होईल. पिण्याच्या पाण्याची टाकी शेडमध्ये विशिष्ट उंचीवर बसवावी. बाहेरच्या बाजूस बसवली असेल तर त्यास बारदानाची पोती गुंडाळून त्यावर थंड पाणी टाकावे, जेणेकरून आतमधील पाणी थंड राहण्यास मदत होईल. ब्रॉयलर कोंबडीच्या खाद्यात मुख्य ऊर्जा स्रोत म्हणून वनस्पती तेलाचा ४ ते ५ टक्के या प्रमाणात वापर करावा. अंडी देणाऱ्या कोंबडीच्या खाद्यात खाण्याचा सोडा वापरावा. अंडी देणाऱ्या कोंबडीच्या खाद्य भांड्यात टाकलेल्या खाद्य पृष्ठभाग यावरती शिंपले अथवा मार्बलचे तुकडे थोड्या प्रमाणात पसरावेत. स्प्रिंकलर्स आणि फॉगर्स यांचा वापर हा सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंतच्या दरम्यान दर १ ते २ तासांनी करावा. खाद्य देण्याचे एक वेळापत्रक ठरवून घ्यावे. त्याचे काटेकोरपणे पालन करावे. खाद्य दिल्यानंतर साधारणतः अर्धा ते दीड तासात कोंबड्यांच्या शरीर तापमानात वाढ होते. यामुळे त्यांच्यावरील उष्णतेचा ताण वाढतो, म्हणून दुपारचे खाद्य देणे टाळावे. बाजूच्या भिंतीच्या जाळीवरती बारदान पोती लावावीत. त्यावर स्प्रिंकलर्सचे पाणी पडेल याची सोय करावी. शेड नेटचा वापर करता येतो. शक्य असल्यास शेडमध्ये कुलर किंवा पंखा याचा वापर करावा. छतावर सूर्यप्रकाश परावर्तित करणाऱ्या पत्र्यांचा वापर करावा जेणेकरून शेडच्या आतील तापमान कमी राखण्यास अधिक मदत होते.



# दूधाचे उत्पादन वाढणार; जनावरांच्या आहारात करा या गोष्टींचा समावेश


शेतकऱ्यांचा जोडधंदा म्हणून दूध व्यवसायाकडे पाहिले जाते. तसंच बहुतांश शेतकऱ्यांचा आर्थिक उदारनिर्वाह हा दूध व्यवसायावर अवलंबून असतो. यामुळे शेतकरी पशुची उत्तम काळजी घेतात. तसेच जनावरांचे दूध उत्पादन हे त्यांच्या आहारावर अवलंबून असल्याने खासकरुन शेतकरी त्याकडे जास्त लक्ष देतात. जनावरांना चांगला संतुलित आहार, हिरवा चारा, तेलाची पोळी आणि अन्य आहार दिल्यास जनावरांमधील दूध उत्पादन वाढते. यासोबतच त्यांची प्रतिकारशक्तीही मजबूत असते. यासाठी संतुलित आहाराचा मुद्दा होता. यासोबतच कृषी तज्ज्ञ चांगल्या दर्जाच्या दूध उत्पादनासाठी जनावरांच्या आरोग्यासाठी मोहरीचे तेल देण्याची शिफारस करतात.

आजारी आणि दुर्बल प्राण्यांना मोहरीचे तेल दिल्याने त्यांच्या आरोग्यात चमत्कारीक बदल होतात. मोहरीच्या तेलात भरपूर चरबी असते. ज्यामुळे प्राण्यांना ऊर्जा मिळते आणि ते चपळ होतात. त्यामुळे गायी आणि म्हशींना मोहरीचे तेल देण्याची प्रथा आहे, जेणेकरून त्यांचे आरोग्य लवकर चांगले होईल. मोहरीचे तेल प्यायल्याने जनावरांची पचनशक्ती बळकट होते. त्यामुळे जनावरांना पोटासंबंधीचे आजार होत नाहीत. पशुंना मोहरीचे तेल दिल्याने वासरांची तबेत देखील सुधारते. कारण सुरुवातीला काही दिवस आपण वासरांना जनावरांचे दूध पाजतो. म्हणून वासरांना देखील त्याचा फायदा होतो. थकलेल्या जनावरांना मोहरीचे तेल थोडेसे देणे फायदेशीर ठरते. विशेषत: लांबच्या प्रवासानंतर जनावरे येतात किंवा खरेदी करून आणली जातात. अशा स्थितीत अशक्तपणा आणि थकवा आल्याने ताप येण्याची शक्यता असते. अशा वेळी मोहरीचे तेल दिल्यास प्राण्यांमध्ये लगेच ऊर्जा येत. मोहरीचे तेल जनावरांना खूप उपयुक्त असते.

उन्हाळ्यात उष्णतेपासून सुरक्षा :

उन्हाळ्यात जनावरांची काळजी घेणे खूप गरजेचे असते. त्यासाठी पशुपालक देखील पशुची मोठ्या प्रमाणात काळजी घेतात. तसंच उन्हाळ्यात जनावरांना मोहरीच्या तेलाचे सेवन दिल्यास जनावरांना उष्णता संबंधित समस्यांपासून संरक्षण मिळते. दुसरीकडे जर आपण हिवाळ्याबद्दल बोललो तर, या दिवसात मोहरीचे तेल देखील प्राण्यांमध्ये उष्णता टिकवून ठेवण्यासाठी एक फायदेशीर कृती असल्याचे सिद्ध होते. पशुतज्ज्ञांच्या मते निरोगी जनावरांना मोहरीचे तेल आणि पशुखाद्य रोज देऊ नये. या गोष्टी फक्त आजारी आणि अशक्त प्राण्यांसाठीच चांगल्या आहेत.

दरम्यान, आजारी व अशक्त जनावरांना १०० ते २०० मिली मोहरीचे तेलही दिले जाऊ शकते. यापेक्षा जास्त सेवन करणे जनावरांसाठी हानिकारक ठरू शकते. त्याचबरोबर गाई-म्हशींच्या पोटात वायू किंवा पचन खराब झाल्यास पशुवैद्यांच्या सल्ल्याने ४०० ते ५०० मिली मोहरीचे तेलही द्यावे. यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याने जनावरांना मोहरीच्या तेलाचे सेवन द्यावे. अन्यथा जनावरांना अन्य आजारांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.



# उच्च शिक्षणासाठी केली ८९७ विद्यार्थ्यांना पाच कोटी शहाहत्तर लाखाची मदत

धारूर । प्रतिनिधी

राज्यात सहयोग फांडेशनचे माध्यमातून गेल्या तेरा वर्षा पासून शिक्षण हे विकासाचे मुख्य माध्यम असल्याने हुशार व गरजू एक ही विद्यार्थी आर्थिक परीस्थीती मुळे आपले ध्येय प्राप्त करण्या पासून वंचित राहणार नाही या साठी विद्यार्थी विकास योजनेच्या माध्यमातुन ख-या गरजू विद्यार्थ्याचा शोध घेऊन त्यांना उच्च शिक्षणा साठी सर्व परीने सहकार्य केले जाते विद्यार्थी विकास योजना आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ,५९७ विद्यार्थ्यांना, ५ कोटी ८७ लाख रुपये मदत करण्यात आली. देणगीदारा मुळे हे काम यशस्वी झाले .या योजनेच्या नियोजनातील प्रमुख मार्गदर्शक रविंद्र कर्वेजी व नियोजनातील कार्यकर्ता व पालककार्करते यांचे संयुक्त मेहनतीचे हे यश आहे हे मात्र निश्चीत हे लिहीत असताना अतिशय आनंद होत आहे की दर वर्षीप्रमाणे सहयोग फाऊंडेशन चे माध्यमातून विद्यार्थी विकास योजनेचे प्रमुख रविंद्रजी कर्वे यांचे प्रमुख मार्गदर्शन खाली राज्यातील होतकरू गरजु विद्यार्थी आर्थिक परीस्थीती मुळे उच्च शिक्षणा पासून वंचित राहु नयेत या साठी विद्यार्थी सहयोग फांडेशन चे माध्यमातून राज्यभरात गेल्या तेरा वर्षा पासून शैक्षणीक विकास हा समाजाचे प्रगतीचे मुख्य माध्यम आहे हे मुलमंत्र ओळखून हे कार्य सुरु आहे.या



प्रवाहातं काम करणारे सर्व प्रमुख कार्यकर्ते व १०० पालक कार्यकर्ते हे सेवाभावी वृत्तीने व राष्ट्र भक्तीने कार्य करतात व सर्व देणगीदार यांच भावनेने मदत करतात.

ज्या विद्यार्थ्यांनी या योजनेच्या सहकार्याने शिक्षण पूर्ण केले अशा विद्यार्थ्यांनी आत्ता पर्यंत रू ५० लाखाहून अधिक रक्कम नवीन विद्यार्थ्यांच्या शिक्षणा साठी परत केली आहे. तेरा वर्षात १९८४ विद्यार्थ्यांना २१ कोटी ६ लाख रुपया वरील योजनेमध्ये समावेश करण्यासाठी विद्यार्थ्याला १०वी मध्ये ९०% हून अधिक मार्क्स १२वी मध्ये ७०% हून अधिक मार्क्स आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विविध प्रवेश परीक्षांमध्ये चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिलाण्या एवढे मार्क्स मिळणे अपेक्षित आहे तसेच संस्थेचा त्या भागातील पालक कार्यकर्ता प्रत्यक्ष गृह भेट करून पालक आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याची आणि घरातील वातावरण शिक्षणाला पोषक असल्याची खात्री करून मगच मदत दिली जाते. विद्यार्थि १०० हून अधिक पाल २०२३-२४ हेही वर्ष सेवा सहयोग फ़ाऊंडेशनच्या विद्यार्थी विकास योजनेसाठी अतिशय उत्तम रीतीने पार पडले. प्रत्येक आकडेवरी मध्ये आधीचे सर्व निकष मागे टाकत नवीन मापदंड प्रस्थापित केले गेले आहेत. अर्थातच याचे श्रेय सातत्याने या योजने मागे उभे असलेले देणगीदार, हितचिंतक, या विद्यार्थ्यांना शोधून काढणारे पालक कार्यकर्ते, विपरीत परिस्थितीतही भव्य दिव्य स्वप्न पाहणारे या योजनेतील लाभ घेणारे विद्यार्थी आणि त्यांच्या मागे पहाडासारखा उभा राहणारा पालक वर्ग या सर्वांना आहे. या सर्वांकडून योजनेसाठी असाच पाठिंबा सातत्याने मिळत राहो आणि एकही कळी परिस्थितीने कोमजून जावू नये हे आपले स्वप्न साकार होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना आहे. या योजनेत सहकार्य केलेल्या विद्यार्थ्याची वार्षीक प्रगती कडे लक्ष ठेवानं ती कायम ठेवण्या साठी त्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाते व गुणवत्ता टिकवली तरच पुढची मदत केली जाते.

२०२३-२४ या आर्थिक वर्षात एकूण ६.६४ कोटी देणगी रूपाने प्राप्त झाले. यामध्ये २.५२ कोटी व्यक्तिगत देणग्यांमधून, १.६९ कोटी रुपये सी. एस. आर. च्या माध्यमातून आणि १.३१ कोटी ट्रस्ट आणि फाउंडेशन्सच्या च्या माध्यमातून प्राप्त झाले. देणग्यांच्या माध्यमातून आलेल्या या रकमेतून ८९७ विद्यार्थ्यांना रू ५.७६ कोटींचे सहाय्य करण्यात आले, ज्यामधील ४३४ विद्यार्थ्यांना या वर्षी प्रथमच मदत केली गेली आहे. यामध्ये ४४९ विद्यार्थी आणि ४४८ विद्यार्थिनींचा समावेश आहे. विद्यार्थी आणि विद्यार्थिनींची संख्या समसमान आहे याचा आम्हाला अभिमान आहे. हे विद्यार्थी महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांतील आणि बहुसंख्य तालुक्यातील आहेत. याव्यतिरिक्त भारतातील २३ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशातील प्रातिनिधिक विद्यार्थीही आहेत. विद्यार्थ्यांना आवश्यक ती मदत करतानाच दोन शाळांच्या उभारणीसाठी अंशतः मदत म्हणून रू ५७ लाखांचे सहाय्य केले. वरील विद्यार्थ्यांमध्ये इंजिनिअरिंग (३९४), मेडिकल (१७९), नर्सिंग (६६), पदव्युत्तर (५१), डिप्लोमा (४३), सी. ए. (१०) आणि आर्किटेक्चरच्या (६) आणि अन्य विद्यार्थ्यांचा समावेश आहे. आजच्या घडीला १३ आय. आय. टी.ज मध्य आपले १८ विद्यार्थी असून ३ एन. आय. टी. ज मध्ये ४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मेडिकलच्या विद्यार्थ्यांपैकी १३४ विद्यार्थी एम. बी. बी. एस., २७ बी. ए. एम. एस., ७ बी. डी. एस., ३ बी. एच. एम. एस. ४ एम. डी. आणि ४ अन्य फॅकल्टीजचे शिक्षण घेत आहेत.

आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे विद्यार्थी विकास योजनेचा प्रशासकीय खर्च केवळ १.०७% एवढा कमी ठेवण्यात आपण यशस्वी झालो आहोत. अर्थात याचे श्रेय मुख्यतः निरपेक्षपणे आणि निःस्वार्थीपणे काम करणारे आपले पालक कार्यकर्ते आणि अन्य सहकारी यांना आहे हे ही नमूद केले पाहिजे. सर्वांच्या सहकार्याने विद्यार्थी विकास योजनेच्या कामाचा परीघ दिवसेंदिवस विस्तारत जाईल याचा आम्हाला विश्वास आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील आपल्या अभिमानास्पद कामगिरीमध्ये योगदान देणाऱ्या सर्वांचे परीश्रमा मुळे हे यश मिळाले असून या पेक्षा जोमाने हे कार्य या पुढे केले जाणार असून डिग्री कोर्सेसला शासकीय कोट्यातून लागलेल्या विद्यार्थ्यांना सहकार्य केले जाणार असुन राज्यातील कुठलाच हुशार बुध्दीवान विद्यार्थी उच्च शिक्षणा पासून गरीब आर्थिक परीस्थीती मुळे वंचित राहणार नाही या साठी सहयोगी फाउंडेशन विद्यार्थी विकास योजनेच्या माध्यमातुन काम राज्यभरात करत आहे व हे अविरत सुरु राहणार आहे.

# भगवानगडाच्या माऊलीं मंदिरासाठी पाष्टा ग्रामस्थांची ४८ लाख रुपये देणगी

## २६ कोटींचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन

शिरूर । प्रतिनिधी

श्री क्षेत्र भगवानगडावर होणाऱ्या नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या २६ कोटी रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत.गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे.देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात.नंतर संपूर्ण



ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह. भ. प. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे पाष्टा येथे सप्ताहानिमित्त आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले.त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले.जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ४८ लाख रुपये झाली.नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत.एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे.या भव्य दिव्य मंदिरासाठी लागणारा खर्च अंदाजे २६ कोटी रूपये इतका आहे.त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# विकाराधीनतेमुळे अनंत समस्या निर्माण होतात - मातकर महाराज

बीड । प्रतिनिधी

शिवणी ता.जि.बीड येथे श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे महंत ह.भ.प.नवनाथ महाराज व भवानी गडाचे महंत ह.भ.प. अखंडानंद महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व ह.भ.प.शिवाजी महाराज खिळदकर, जवळेकर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात सहाव्या दिवसाची कीर्तनसेवा श्री शिवाजी विद्यालय बीडचे पर्यवेक्षक ह.भ.प.त्र्यंबक महाराज मातकर यांची संपन्न झाली.

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या म्हणवोनी शरण जावे सर्व भावे देवासी तो हा उतरली पार भवसागर नदीचा या अभंगावर अतिशय मंत्रमुग्ध करणारे चिंतन केले. प्राप्त झालेल्या मनुष्य देहाची सार्थकता कशात आहे, हे आधी समजून घेतले पाहिजे परंतु आपण माणसं विकाराधीन जीवन जगत असल्याने सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. विद्यार्थी ,पालक, समाज संभ्रमात आहेत. हा संभ्रम फक्त अध्यात्मिक नाही तर जीवनविषयक आहे. मनुष्य जन्माची कर्तव्य मनुष्य विसरत चालला आहे. हाच संभ्रम दूर



करण्यासाठी संत अवताराला येऊन अट्टाहासाने सांगण्याचा प्रयत्न करतात. संत विचार हा आनंदी जीवनाचा मूलमंत्र आहे.संतांचा उपदेश हा समाजाच्या नुसता हिताचाच नाही तर उद्धारक असतो. मनुष्य देहच या देव प्राप्तीचे साधन आहे आणि देव म्हणजे सुख किंवा आनंद होय. म्हणून शरण जाण्यासाठी एकच ठिकाण आहे ते म्हणजे भगवान पांडुरंग.अशा भगवंताचे सर्व भावे शरण जावे. जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज म्हणतात, म्हणवोनी शरण जावे सर्व भावे देवासी आपण सर्व भावांनी भगवंत शरणागती पत्करली पाहिजे. काया,वाचा,मन या सर्व भावांनी देवाला शरण गेलो की देव आपणास भवसागरातून तारून नेतो तो हा उतरील पार भवसागर नदीचा असं या अभंगावर अतिशय अभ्यासपूर्ण निरूपण केले. साथसंगतीसाठी गायक बंडू महाराज जटाळ, शिवाजी महाराज शिंदे,भागवत महाराज, श्रीमंत शिंदे, जालिंदर शिंदे व मृदंग वादक सखाराम महाराज यांची होती. कीर्तनासाठी शिवणीचे सरपंच अजय शिंदे, शिवसंग्रामचे बीड तालुकाध्यक्ष विजयराव सुपेकर, प्रा.विलासराव शिंदे, ग्रामपंचायत सदस्य पवन शिंदे, बळीराम शिंदे,भाऊसाहेब शिंदे, श्रीमंत शिंदे,रंगनाथ शिंदे, रामचंद्र कुंटे, विनोद कुटे, भास्कर शिंदे, नारायण शिंदे यांच्यासह शेकडो भाविक उपस्थित होते.

# गोमळवाडा येथील सप्ताहाची सांगता



शिरूर: । प्रतिनिधी

तालुक्यातील गोमळवाडा येथील शांतीब्रम्ह संत वै.भागवत बाबा यांची चौदावी पुण्यतिथी व संस्थानचे अधिष्ठान असलेल्या प्रभु रामचंद्राचा जन्मोत्सव यांचे औचित्य साधून रक्तदान,ज्ञानदान आणि अन्नदानासह सप्ताह सोहळ्याची मोठया उत्साहात सांगता झाली.या वेळी श्री क्षेत्र नारायणगडाचे महंत ह.भ.प.शिवाजी महाराज यांची विशेष उपस्थिती होती.वै.भागवत महाराज यांचा चौदावा पुण्य स्मरण सोहळा व त्यांनी प्रतिस्थापित केलेल्या रामचंद्राचा जन्मोत्सव श्रीराम संस्थानवर महंत भानुदास शास्त्री यांचे अध्यक्षतेखाली व ग्रामस्थ, पंचक्रोशिच्या सहकार्यातून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.याही वर्षी हा सोहळा अकरा ते अठरा एप्रील दरम्यान संपन्न झाला.ज्ञानदानासाठी दिग्गज किर्तनकार तर अन्नदानासाठी ग्रामस्थासह पंचक्रोशी व रक्तदानासाठी तरूणांनी आपले योगदान दिले.

महंत भानुदास शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी रक्तदान शिबीरासाठी पुढाकार घेतला व स्वत: रक्तदान करून रक्तदान हे सर्वश्रेष्ट दान आहे हा संदेश देऊन सामाजिक बांधीलकी जोपासली.यावेळी सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी,सौ.कुमीदीनी संदीपान काकडे,प्रदीप तावरे,गणेश बारगजे,अक्षय शिंदे यांचेसह आदी अनेक तरूण व महिलांनीसुद्धा रक्तदान केले. या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता श्रीराम संस्थानचे महंत भानुदास शास्त्री यांचे काल्याचे किर्तन होऊन उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.यावेळी गोमळवाडा, रूपूर, हिंगेवाडी, राक्षसभुवन, वडाळी, कोळवाडी, पिंपळनेर, वाघीरा, इंदौर आदी ठिकाणासह परिसरातील भाविकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# गजानन विजय ग्रंथाच्या सामुदायीक पारायण सोहळ्याचे अयोजन

## श्री योगेश्वर मंदीरमध्ये विवीध धार्मीक कार्यक्रमाची रेलचेल

अंबाजोगाई

येथील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने गेली ११ वर्षापासु श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण,भक्ती संगीत, किर्तने व पालखी उत्सवाचे अयोजन केले जाते. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी

३ मे ते ६ मे २०२४ दरम्यान पारायण सोहळ्याचे आयोजन श्री योगेश्वर मंदीर हॉल वरचा मजला येथे करण्यात आले आहे. या चार दिवसीय उत्सवात श्री गजानन महाराज विजय ग्रंथाचे पारायण,भक्ती संगीत, किर्तने व पालखी उत्सव सोहळा संपन्न होणार आहे.तरी सर्व भावीक भक्तांनी याचा लाभ घेण्याचे अवाहान भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

ह.भ.प.वै दत्तात्रय जोशी महाराज नळेगाव यांच्या आशीर्वादाने हभप.श्री आनंद महाराज जोशी नळेगाव यांच्या प्रमुख उपस्थितीत येथील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने गेली ११ वर्षापासु श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण,भक्ती संगीत, किर्तने व पालखी उत्सवाचे अयोजन केले जाते. मंडळाचे हे १२वर्ष आसुन ३ मे ते ६ मे २०२४ दरम्यान पारायण सोहळ्याचे आयोजन श्री योगेश्वर मंदीर हॉल वरचा मजला अंबाजोगा येथे करण्यात आले आहे.चैत्र कृ शु १० शुक्रवार ३ मे २०२४ रोजी पहाटे ४ वा मंगलध्वनीने सुरवात होणार आसुन पहाटे ५ वा 'श्रींना' रुद्राभिषेक व आरती, सकाळी ७ ते १० श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण - अध्याय १ ते ७,दु ४ वा भक्तीसंगीत मातृस्वर संगीत विद्यालय व समुह अंबाजोगाई सायं ६.३० ते ८.३० नारदीय किर्तन ह.भ.प.लक्ष्मीप्रसाद बुवा पटवारी, माजलगाव यांचे सायं ६.३० ते ८.३० नारदीय किर्तन होणार आहे.तर शनिवार ४ मे पहाटे ५ वा 'श्रींना' रुद्राभिषेक व आरती सकाळी ७ ते १० श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण अध्याय ८ ते १४ त्यानंतर आरती, दु ४ वा भक्तीसंगीत,स्वररंग संगीत विद्यालय - शैलेश पुराणिक,तालस्पर्श तबला अकादमी - रत्नदिप शिगे व पोस्टमास्तर भागवत पाठक यांची बासरी वादन होणार आसुनसायं ६.३० ते ८.३० नारदीय किर्तन ह.भ.प. बाळु बुवा नाव्हेकर गंगाखेड यांचे होणार आहे. रविवार ५ मे रोजी पहाटे रुद्राभिषेक व आरती सकाळी ७ ते १० अध्याय १५ ते २१ त्यानंतर ग्रंथपुजन, ग्रंथदिंडी, पारायणारती , सायंकाळी ६ वाजता श्री गजानन महाराजांचा पालखी उत्सव सोहळा श्री योगेश्वरी मंदीर - मंडी बाजार - पाटील चौक - जयवंती पुला पासुन - कुंभार गल्ली -श्रीगणेश साई मंदीर - मंगळवार पेठ - गुरवार पेठ मार्गेश्री योगेश्वरी मंदीरात येणार आहे.६ मे २०२४

पहाटे रुद्राभिषेक व आरती,सकाळी १० वा काल्याचे किर्तन : ह.भ.प. श्री शाम महाराज नेरकर(शास्त्री)त्यानंतर महाआरती व महाप्रसाद सायं ७ वा श्रींचा श्री संत गजानन महाराज भक्त मंडळ अंबाजोगाई संचलित, 'सत्संग श्री गजाननाचा' व ''श्रींची'' दिपोत्सवात शेजारती होऊन कार्यकमाची सांगता श्री योगेश्वर मंदीर हॉल येथे होणार आसुन भावीक भक्तांनी याचा लाभ घेण्याचे अवाहान श्री संत गजानन महाराज भक्त मंडळ अंबाजोगाई यांच्या च्या वतीने करण्यात आले आहे

# रिपाइंकडून ईदचे आयोजन:कागदे

बीड । प्रतिनिधी

हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतिक असलेल्या रमजान ईदचे औचित्य साधून सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी व हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी युवा रिपाइ प्रदेश अध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी दरवर्षीप्रमाने याहीवर्षी शनिवार (दि.२०) एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ५ नंतर रात्री ८ या वेळेत बशीर गंज चौक बीड येथे बीड शहर रिपाइंच्यावतीने ईद मिलाफ कार्यक्रम आयोजन केले आहे.शनिवार (दि.२०) एप्रिल २०२४ रोजी बीड शहरात रिपाइंच्या वतीने रमजान ईदचे औचित्य साधून आयोजित केलेल्या ईद-मिलाफच्या कार्यक्रमास हिंदू मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक तथा युवा रिपाइ प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे,

मझरखान,सिद्दिकी फारुकी, राजू जोगदंड, रमेश गंगाधरे, किसन तांगडे, सय्यद जफर, रफिक भाई, सुलतान बाबा, नरुल खान, फरहान बागवान, रणजीत शिंगारे, कपिल खान वसीम बागवान, मुखीद बागवान, आबेद बागवान, अख्तर फारुकी, सैफ फारुकी, मीरान फारोखी, आदींनी केली आहे.

# स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा पदवीप्रदान समारंभ

## डॉ. लहाने, डॉ. दिपक कटारे यांची प्रमुख उपस्थिती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या २०१८ च्या बॅचचा पदवी प्रदान समारंभ मोठ्या उत्साहाने संपन्न झाला. यावेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे सेवानिवृत्त संचालक पद्मश्री डॉ. टी. पी. लहाने, प्रख्यात -हदयरोग तज्ञ डॉ. दिपक कटारे, संभाजी नगर येथील हेडगेवार रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. तुपीकर, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या २०१८ च्या एमबीबीएस बॅचचा पदवीप्रदान समारंभ १५ एप्रिल रोजी येथील आर्यवीर मंगल कार्यालयाच्या लॉन्सवर मोठ्या उत्साहाने संपन्न झाला. यावेळी प्रसिद्ध नेत्रतज्ञ तथा वैद्यकीय शिक्षण विभागाचे सेवानिवृत्त संचालक पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धापटे, छत्रपती संभाजीनगर च्या हेडगेवार रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. तुपीकर आणि स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाचे



माजी विद्यार्थी व प्रख्यात हृदयरोगतज्ञ डॉ. दीपक कटारे यांना या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते. हा कार्यक्रम स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी आयोजित व संचालित केला होता. या कार्यक्रमासाठी सर्व पदवीधर विद्यार्थ्यांचे पालक व कुटुंबीय, तसेच ज्येष्ठ-कनिष्ठ वर्गाचे विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात सर्व प्रमुख पाहुण्यांच्या सत्काराने झाली. डॉ. तात्याराव लहाने यांनी आपल्या भाषणात स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाचा गौरवशाली इतिहास विद्यार्थ्यांना सांगितला. त्यांनी विद्यार्थ्यांना रुग्ण व त्यांच्या कुटुंबाशी कसे वागावे हे समजावून सांगितले आणि डॉक्टर म्हणून आपल्या प्रवासात आपल्या पालकांना विसरू नये असे आवाहन केले.तर अधिष्ठाता डॉ. शंकर धापटे म्हणाले की आता तुम्ही सर्व पदव्युत्तर शिक्षणा साठी जाणार आहात आणि सर्व विषयांना सारखे महत्त्व आहे, त्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे अभिनंदन केले.

डॉ. दीपक कटारे यांनी वर्षानुवर्षे वैद्यकीय पद्धत कशी बदलत आहे व वैद्यकीय व्यवसायातील सध्याच्या आव्हाना बाबदमाहिती देऊन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. जीवनातील सकारात्मक दृष्टिकोन आणि डॉक्टरांच्या सामाजिक जबाबदाऱ्यांवर या विषयावर सर्वाधीक भर दिला. कार्यक्रम हिप्पोक्रेटीसच्या शपथविधीने संपन्न झाला.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात 'प्रयोजनमूलक हिंदी' अभ्यासक्रम



पाटोदा । प्रतिनिधी


येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील हिंदी विभागामार्फत आयोजित 'प्रयोजनमूलक हिंदी' हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम नुकताच संपन्न झाला.

यानिमित्त १८ एप्रिल रोजी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या हस्ते अभ्यासक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. एक महिना कालावधी असलेला हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम हिंदी विभागाच्या वतीने प्रतिवर्षी आयोजित करण्यात येतो. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कार्यालयीन हिंदी, हिंदी भाषेतील व्यावहारिक शब्द, रोजगारातील संधी आदी विषयावर मार्गदर्शन केले जाते. हा अभ्यासक्रम चालविण्यामागे राजभाषेचा प्रचार व प्रसार करणे व हिंदी संभाषण कौशल्ये विकसित करणे हाही एक प्रमुख उद्देश आहे. प्रमाणपत्र वितरणप्रसंगी हिंदी विभाग प्रमुख डॉ. न. पु. काळे व डॉ. दिलीप गिऱ्हे उपस्थित होते. अभ्यासक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी प्रा. जयंत साठे यांचेही सहकार्य लाभले.

दैनिक राज्य लोकतंत्र

महासंग्राम

शनिवार, दि.२० एप्रिल २०२४ | ६



# पंकजाताई मुंडे यांना अभूतपूर्व मताधिक्य देण्याचा भाजप अल्पसंख्यांक मोर्चा आणि कामगार आघाडीचा निर्धार

## प्रत्येक बूथद्वारे पूर्वीपेक्षा अधिक मताधिक्य द्या, खा.प्रितमताईंच्या पदाधिकाऱ्यांना सूचना

**बीड । प्रतिनिधी**

महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या विजयासाठी आता भाजपचा अल्पसंख्यांक मोर्चा आणि कामगार आघाडी सरसावली आहे. पंकजाताईंना अभूतपूर्व मताधिक्य देण्याचा निर्धार जिल्ह्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या झालेल्या बैठकीत करण्यात आला. या दोन्ही बैठकीस खा. प्रितमताई मुंडे यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. मागील दहा वर्षाच्या काळात पंकजाताई मुंडे यांनी केलेल्या विकास कामांमुळे त्यांचा विजय निश्चित आहे, डोअर टू डोअर प्रचार यंत्रणा राबवून केंद्र सरकारच्या योजना आणि पंकजाताई मुंडे यांनी केलेली विकासकामे मतदारांपर्यंत पोहोचवा आणि पूर्वीपेक्षा अधिक मते मिळवून देण्यासाठी परिश्रम घ्या' अशा सूचना खा. प्रितमताई मुंडे यांनी पदाधिकाऱ्यांना केल्या.



बीड भाजपच्या कामगार आघाडी व अल्पसंख्यांक मोर्चाची लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने काल ( गुरुवार ) बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत खा. प्रितमताई मुंडे यांनी पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की 'ग्रामविकास मंत्री असताना पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्ह्याला मोठ्या प्रमाणात विकास निधी मिळवून दिला. या माध्यमातून त्यांनी आपल्या जिल्ह्यात सर्वसामावेशक विकासाचे बिजारोपन केले आहे. तसेच कष्टकरी कामगार, ऊसतोड मजुरांना न्याय देण्याचे काम ही पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून झाले असून नुकतीच ऊसतोड मजुरांना इतिहासात मिळाली नाही ऐवढी दरवाढ पंकजाताई मुंडे यांनी मिळवून दिली असल्याचे खा.प्रितमताई म्हणाल्या.

आपला जिल्हा कष्टकरी, ऊसतोड मजुरांचा जिल्हा आहे. कामगार आघाडीने कष्टकरी, कामगारांचे मित्र होऊन त्यांच्या अडचणी आमच्यापर्यंत आणाव्यात. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना गरजू लोकांपर्यंत पोहोचवून पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी त्यांचे आशीर्वाद उभे करावेत. येणारा काळ देखील आपलाच आहे, या काळात कामगार आघाडीच्या माध्यमातून कामगार मित्र आणि विविध योजनांची सांगड घालून कामगार, कष्टकऱ्यांसाठी मोठे काम आपल्याला उभारायचे आहे, आपल्या या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आपल्या नेत्या आणि महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना मताधिक्य मिळवून दया' असं आवाहन खा. प्रितमताई मुंडे यांनी उपस्थितांना केल.

### आवाम में जाएंगे, पंकजाताई को वोट दिलायेंगे; अल्पसंख्यांक आघाडीने केला विजयाचा संकल्प

भाजप अल्पसंख्यांक आघाडीने लोकसभा निवडणुकीत संपूर्ण ताकदीने पंकजाताईंच्या विजयात योगदान देण्याचा संकल्प या बैठकीदरम्यान केला. मुस्लिम समाज बांधवांमध्ये लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब, पंकजाताई आणि प्रितमताई यांच्या विषयी वेगळा जिव्हाळा आहे, त्यांचे कार्य सर्वसमावेशक आहे' अशा भावना अनेकांनी यावेळी व्यक्त केल्या. तर खा. प्रितमताई मुंडे यांनी यावेळी पदाधिकाऱ्यांना विविध सूचना केल्या. जिल्ह्यातील प्रत्येक मतदाराला पंकजाताई मुंडे यांनी केलेल्या सर्वसमावेशक विकासाची माहिती दया, पासपोर्ट कार्यालय, प्रधानमंत्री घरकुल योजना, मोफत अन्नधान्य, पाच लाखांपर्यंत मोफत उपचार' या केंद्र सरकारच्या योजनांची उपयुक्तता सांगून विरोधकांचा अपप्रचार खोडून काढा. आपल्या बूथद्वारे गतवेळेपेक्षा अधिक मतदान पंकजाताईंना मिळवून दया अशा सूचना त्यांनी दिल्या.

### खा. प्रितमताईंकडून नुकसानीची पाहणी ; बीड शहरात मतदारांच्या घेतल्या भेटी

बीड तालुक्यातील नाळवंडी इथे अवकाळी पाऊस आणि वाऱ्यामुळे अतोनात नुकसान झाले आहे, खा. प्रितमताई मुंडे यांनी झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानग्रस्तांना लवकरात लवकर मदत उपलब्ध करून देण्याची मागणी प्रशासनाकडे केली. तद्नंतर त्यांनी बीड शहरातील मतदारांना भेटून त्यांच्याशी चर्चा केली. पंकजाताई मुंडे या जिल्ह्यासाठी विकासाचे व्हिजन असलेल्या सुसंस्कृत, सर्वसमावेशक आणि विकासाभिमुख नेत्या आहेत. आपल्या जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला पूर्ववत गती देण्यासाठी पुन्हा एकदा त्यांच्या पाठीशी मतदानरुपी आशीर्वाद उभे करा' असे आवाहन त्यांनी यादरम्यान मतदारांना केले.



माजलगाव:– बीड लोकसभेचे इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ सारिकाताई सोनवणे, शिवकन्याताई गुंड यांनी शेकापचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्या मोठीवाडी येथील क्रांतिसिंह निवासस्थानी भेट दिली असता त्यांचा सत्कार करताना.. सौ.अर्चना गोले,सौ.प्रियंका गोले,सौ. अल्का गोलेआदी.

# आरक्षणासाठी बलिदान दिलेल्या आबासाहेब शिंदेंच्या कुटुंबीयांची बजरंग सोनवणेंनी घेतली भेट

**गेवराई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी बलिदान देणाऱ्या माटेगाव (ता. गेवराई) येथील कै. आबासाहेब बालासाहेब शिंदे या तरुणाने आत्महत्या केली होती. या शिंदे कुटुंबीयांची राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी भेट घेवून सांत्वन केले.

बीड लोकसभेचे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे हे गेवराई तालुक्यात प्रचार दौऱ्यावर होते. त्यांनी माटेगाव येथील मराठा आरक्षणासाठी बलिदान देणाऱ्या आबासाहेब बालासाहेब शिंदे यांच्या घरी भेट घेवुन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. त्यांनी



निवडून आल्यानंतर संसदेत आरक्षण प्रश्नी आवाज उठवू. मराठा आरक्षणावर संसदेत चर्चा करून त्याला वाचा फोडणे हीच खरी आबासाहेब शिंदे यांना श्रद्धांजली असेल अशी भावना ही बजरंग बप्पा सोनवणे यांनी व्यक्त केली. यावेळी माजी मंत्री बदामराव आबा पंडित, किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पूजाताई मोरे, अण्णासाहेब राठोड, युवा नेते सभापती युद्धजीत पंडित, अण्णासाहेब राठोड, श्रीनिवास बेदरे, धम्मपाल कांडेकर, माजी सभापती पंढरीनाथ लगड, अमोल करांडे, अमोल सुतार यांच्यासह इंडिया आघडीतील घटक पक्षातील नेते उपस्थित होते.

# जातीचं राजकारण पुढे करत विकासाच्या मुद्याला तिलांजली

## भाजपा उमेदवारावर बजरंग सोनवणेंचा आरोप

बीड /माजलगाव :- आम्ही मतदार संघातील समस्या आणि विकास या मुद्द्यावर निवडणूक लढवत आहोत. परंतु भाजप उमेदवाराकडे विकासावर बोलायलाला काहीच नसल्याने ते सर्वसामान्यांचे लक्ष विचलित करण्यासाठी जातीपातीचे राजकारण करत असल्याचा गंभीर आरोप बजरंग सोनवणे यांनी माजलगाव तालुक्यातील मंगरूळ येथे गावकऱ्यांशी संवाद साधताना केला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि इंडिया आघाडीचे लोकसभेचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे, माजी मंत्री लोकनेते बदामराव आबा पंडित, राष्ट्रवादी किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पूजाताई मोरे यांच्यासह नारायणराव डक नारायणराव होके, मनोहर डाके, दयानंद




स्वामी, दत्ता आबा, अण्णासाहेब डक, होके पाटील, मंजूर भाई, ॲड. गोले, माजी सभापती पंढरीनाथ लगड यांनी माजलगाव तालुक्यातील गावांना भेटी देत मतदारांशी संवाद साधत आहेत. येथे बजरंग सोनवणे मतदारांशी संवाद साधताना पुढे म्हणाले की, आम्ही जातीपातीचे राजकारण करणार नाही. आम्ही महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाच्या परंपरेला जपणारी माणसे आहोत . मात्र मागील पंधरा वर्षा पासून एकाच कुटुंबात सत्ता असताना अद्याप जिल्ह्यातील रेल्वेचे काम पूर्णत्वाकडे गेले नाही. याच गतीने जर काम राहिले तर आणखी २५ वर्षे रेल्वे मार्ग पूर्ण होण्यास लागतील . आम्ही फक्त वाट बघायची अन यांनी आपली राजकीय पोळी भाजून घ्यायची अन पुन्हा पाच वर्षांनी तेच तुणतुणे वाजवायचे हा लोकांच्या भावनांशी खेळच असल्याचा आरोप त्यांनी केला . मात्र आपण निवडून आलो तर दोन वर्षांमध्ये रेल्वे चे काम पूर्ण करीन असे स्पष्ट आश्वासन त्यांनी दिले.त्याच बरोबर जिल्ह्याच्या विकासासाठी आपल्या खासदाराने तोंड उघडलेले प्रत्यक्ष कोणी पाहिले आहे काय ? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. त्या सोबत माजलगाव परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात कापूस आणि सोयाबीनचे उत्पादन होत असताना आज पर्यंत एकही नवीन प्रकल्प का आला नाही ? या प्रश्नाचे उत्तर खासदार देतील का असे म्हणून स्वतः विषयी बोलताना ते म्हणाले की, मी साधा जिल्हा परिषद सदस्य असताना दोन कारखान्याची चालू शकतो, परंतु सत्ता असताना स्वतःच्या वडिलांनी सुरु केलेला कारखाना बंद करून शेतकरी, कामगार यांना देशोधडीला लावण्याचे पाप केल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र आपण निवडून आल्या नंतर मतदार संघातील दरडोई उत्पन्न वाढविणे. रोजगार निर्मिती वेगवेगळ्या प्रकल्प आणणे. आणि सामान्यांची चूल पेटण्यासाठी काम करणे हे माझे व्हिजन असल्याचे सांगितले. म्हणून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी तुतारीधारी माणूस या चिन्हावर मतदान करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले

# ३९ बीड लोकसभा मतदारसंघ निवडणूक दुसऱ्या दिवशी ३ अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

**बीड । प्रतिनिधी**

३९ बीड लोकसभा मतदारसंघामध्ये नामनिर्देशन पत्र सादर करण्याच्या दुसऱ्या दिवशी आज ३ उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले. या तीनही उमेदवारांनी अपक्ष म्हणून आपला अर्ज सादर केला.

३९ बीड लोकसभा मतदारसंघातून आज ०३ अपक्ष उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले . शेख तौसीफ अब्दुल सत्तार, सादेक इब्राहिम शेख, उदयभान नवनाथ राठोड अशी या अपक्ष उमेदवारांची नावे आहेत. लोकसभा मतदारसंघामध्ये पहिल्या दिवशी एकही नामनिर्देशनपत्र दाखल झाले नव्हते. गुरुवारी ३९ इच्छुक उमेदवारांना ९२ नामनिर्देशन पत्रांची वाटप झाले होते. आज शुक्रवारी



३० इच्छुक उमेदवारांना ६८ नामनिर्देशन पत्राचे वाटप करण्यात आले आहे. असे एकूण ६९ इच्छुक उमेदवारांना १६० नामनिर्देशन पत्रांचे वाटप करण्यात आले आहे.३९ बीड लोकसभा मतदारसंघासाठी दि. १८ एप्रिल २०२४ रोजी अधिसूचना जारी करण्यात आली असून २५ एप्रिल २०२४ ही उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. तर २६ एप्रिल२०२४ रोजी उमेदवारी अर्जांची छानणी करण्यात येणार आहे. २९ एप्रिल २०२४ ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे.सोमवार दि. १३ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. तर ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक आदर्श आचारसंहिता ६ जूनपर्यंत लागू राहणार आहे.

# छ. संभाजीनगरात खैरे विरुद्ध भुमरे असा होणार सामना

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीने याआधीच छत्रपती संभाजीनगरासाठी आपल्या उमेदवाराची घोषणा केली आहे. या जागेवर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून माजी खासदार चंद्रकांत खैरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. खैरे यांना तिकीट मिळाल्यानंतर महायुतीकडून कोणाला संधी दिली जाणार, असे विचारले जात होते. शिवसेना-भाजप यांच्या युतीत हा मतदारसंघ नेहमी शिवसेनेकडे राहिलेला आहे. यावेळी मात्र भाजपनेदेखील या जागेवर आपला दावा सांगितला होता. परिणामी या जागेवर महायुतीने उमेदवाराची घोषणा केली नव्हती. दरम्यान, आता संदिपान भुमरे यांच्या नावावर मात्र आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिक्कामोर्तब केले आहे.

संदिपान भुमरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्यामुळे आता छत्रपती संभाजीनगरमध्ये दोन शिवसैनिकांमध्ये लढाई रंगणार आहे. छत्रपती संभाजीगरच्या उमेदवारीबाबत एकनाथ शिंदे यांची एक महत्त्वाची बैठक पार पडली होती. या बैठकीतच संदिपान भुमरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. या निर्णयानंतर आता संदिपान भुमरे यांनीदेखील तयारी चालू केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार ते येत्या २५ एप्रिल रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज भरणार आहेत.



### वंचितनेही दिला उमेदवार, नेमके काय होणार?

संदिपान भुमरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर येथे शिवसैनिक विरुद्ध शिवसैनिक अशी लढत पक्की झाली आहे. मात्र येथे वंचित बहुजन आघाडीनेही आपला उमेदवार दिला आहे. वंचितच्या उमेदवाराचा चंद्रकांत खैरे यांना फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळात नेमके काय होणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# माढातील डॉ. अनिकेत देशमुख यांचे बंड टळले

**सोलापूर । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीने आपल्यावर अन्याय केल्याचे सांगून माढा लोकसभा मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढविण्याची घोषणा करणारे शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते डॉ. अनिकेत देशमुख यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या भेटीनंतर आपले बंड मागे घेतले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील वरिष्ठ नेत्यांनी दिलेला सल्लाही त्यांनी मानल्याचे दिसते. त्यामुळे माढ्यात मोहिते पाटील यांनी जानकर यांच्यानंतर अनिकेत देशमुख यांनाही आपल्यासोबत कायम ठेवण्यात यश मिळविले आहे.यंदाच्या लोकसभा निवडणुकीत माढा मतदारसंघ सर्वाधिक चर्चेत राहिला आहे. मोहिते पाटील यांना उमेदवारी नाकारल्यानंतर त्यांनी भाजपला जय श्रीराम करत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर या मतदारसंघातील उत्तम जानकर यांना देवेंद्र फडणवीस यांनी भेटीचे निमंत्रण दिले. फडणवीसांच्या भेटीनंतर जानकर हे धैर्यशील मोहिते पाटील यांच्यासह पवारांना भेटले. तो विषय संपत नाही तोच महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या शेकापने माढा लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची घोषणा केली. त्यांच्या घोषणेने सोलापूरमध्ये एकच खळबळ उडाली होती.



संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या माढा लोकसभा मतदारसंघात राजकीय हालचाली सुरू असताना आता स्व. गणपतराव देशमुख यांच्या नातवानेही माढा लोकसभा मतदारसंघात पुन्हा शड्डू ठोकला होता. दोन दिवस कार्यकर्त्यांच्या लागोपाठ बैठका घेऊन माढा लोकसभा मतदारसंघातून डॉ. अनिकेत देशमुख यांनी महाविकास आघाडीकडून आम्हाला गृहीत धरले असून आमच्यावर अन्याय झाल्याची भावना व्यक्त करीत अपक्ष निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून तिसरा पर्याय असावा, अशा भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्याची माहिती डॉ. अनिकेत देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली होती.

माढा लोकसभा मतदारसंघावर यंदा प्रथमच महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या शेतकरी कामगार पक्षाने दावा सांगितला होता. शेतकरी कामगार पक्षाकडून स्व. गणपतराव देशमुख यांचे नातू डॉ. अनिकेत देशमुख निवडणूक लढविण्याच्या तयारीत होते. परंतु ऐनवेळी माढ्याची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाला मिळाली आणि भारतीय जनता पार्टीतून राष्ट्रवादीत प्रवेश केलेल्या धैर्यशील मोहिते-पाटील यांना माढ्याची उमेदवारी जाहीर करण्यात आली. मोहिते-पाटील यांच्या उमेदवारीनंतर महाविकास आघाडीत इच्छुक उमेदवार उघडपणे नाराजी व्यक्त करू लागले. स्व. गणपतराव देशमुख यांचे नातू आणि २०१९ रोजी सांगोला विधानसभा निवडणुकीत तब्बल एक लाख मते मिळवणाऱ्या डॉ. अनिकेत देशमुख यांनीही बंडाचे निशाण फडकावत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे जाहीर केल्याने महाविकास आघाडीची डोकेदुखी चांगलीच वाढली होती. डॉ. अनिकेत देशमुख यांनी आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी पत्रकार परिषद घेतली होती. परंतु त्याच्या काही मिनिटे अगोदरच शरद पवार यांचा त्यांना फोन आला व लगेचच भेटीसाठी निमंत्रण दिले असल्याची माहिती स्वत: अनिकेत देशमुख यांनी दिली होती. यापार्श्वभूमीवर डॉ अनिकेत देशमुख व शरद पवार यांची भेट झाली आणी अनिकेत देशमुख यांनी त्यानंतर माघार घेतली असून माढा लोकसभेला मोहिते पाटील गटावर आलेले गंडांतर शरद पवार यांच्या मध्यस्तीने टळले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष



# पोलिस आयुक्त आणि पुणेकरांच्या साह्याने हरवलेली बारा वर्षीय लेक काही तासात आईच्या कुशीत

**पुणे । प्रतिनिधी**

आई-वडील रागावल्यामुळे १२ वर्षाची मुलगी घरातून निघून गेल्याचा प्रकार उघडकीस आला. पुण्यातील नांदेड सिटी येथून काल गुरुवार दिं. १८ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजताच्या सुमारास ही मुलगी घरातून निघून गेली होती. उशिरापर्यंत मुलीचा पत्ता लागत नसल्यामुळे कुंटूबीयांनी पोलीसात धाव घेतली सोबतच हरवलेल्या १२ वर्षांच्या मुलीचा फोटो सोशल मीडियावरून व्हायरल केला. दरम्यान पुणे पोलीसांना मुलगी मिसिंग असल्याची माहिती मिळताच पोलीसांनी तात्काळ यंत्रणा कामाला लावली विषेश म्हणजे या मुलीच्या शोधासाठी स्वत: पोलीस आयुक्त अमितेश कुमार रस्त्यावर उतरले. सोशल मीडियाचा आधार अन् पुणे पोलीसांच्या संवेदनशील तपासामुळे अखेर १२ वर्षीय मुगली आई-वडिलांच्या कुशीत विसावली. मुलीच्या शोधासाठी हजारो पुणेकरांनी मिसिंगचे व्हॉट्सअप स्टेट्स ठेवत मदत केली.

आई-वडील रागाल्यामुळे पुण्यातील नांदेड सिटीतील विद्या प्रतिष्ठान नांदेड सिटी पब्लिक स्कूलमध्ये शिकणारी १२ वर्षीय मुगली ही दुपारी २ वाजताच्या सुमारास घरातून निघून गेली. घरातून बाहेर पडलेली मुलगी संध्याकाळ झाली तरी परत आली नसल्यामुळे तिचा शोध आई-वडिलांनी घेण्यास सुरुवात केली. मुलगी कुठेच मिळत नसल्यामुळे कुंटूबीयांनी पोलीसात धाव घेतली तसेच मुलगी मिसिंग असल्याची माहिती व फोटो समाज माध्यमांवर प्रसारित केला. त्यानंतर ही माहिती शिवाभाऊ पासलकर यांच्या महाराष्ट्र राज्य मिसिंग केस इन्वेस्टीगेशन ग्रुपवर ही आली. तेव्हा लागलीच पासलकर यांनी मुलीच्या कुंटूबीयांची परवानगी घेत मुलगी हरवल्याची माहिति त्यांच्या ग्रुपवर व्हायरल केली. हा मेसेज वाऱ्यासारखा शहरभर पसरला आणि हजारो पुणेकरांनी या मुलीचे व्हॉट्सअप स्टेट्स ठेवले. याच दरम्यान पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना याबाबत माहिती मिळाली तेव्हा आयुक्तांनी तात्काळ यंत्रणा कामाला लावत स्वत: मुलीचा शोध घेण्यासाठी आयुक्त रस्त्यावर उतरले.

१२ वर्षीय ही मुलगी घराबाहेर पडल्यानंतर सुरुवातीला २ वाजता नांदेड सिटीतील डेस्टीनेशन सेंटवर गेली तिथे तिने आईसक्रीम खाली. त्यानंतर ती रिक्षाने स्वारगेटला गेली तेथून तिने आळंदी गाठले. आळंदीतून रिक्षाने ती आळंदी फाटा



येथे आली तेथून दुसऱ्या रिक्षाने वाघोलीत आली. दरम्यान, महाराष्ट्र राज्य मिसिंग केस इन्वेस्टीगेशन ग्रुपवरचे मुलगी मिसिंगचे पोस्टर सर्वत्र व्हायरल झाले होते शिवाय पोलीस व मुलीचे कुंटूबीय सुद्धा तिचा शोध घेत होते. यादरम्यान या मुलीने वाघोलीतील मुख्य चौकात असलेल्या 'जय महाराष्ट्र' येथे वडापाव खाल्ला यावेळी या वडापाव विक्रेत्याकडे व्हायरल झालेले मिसिंगचे पोस्टर आले होते. तेव्हा त्याने आपल्याकडे ही मुलगी आली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य मिसिंग केस इन्वेस्टीगेशन ग्रुपचे पासलकर यांना दिली. पालसकर यांनी लागलीच जय महाराष्ट्र वडापाव गाठले मात्र तोपर्यंत ही मुलगी तेथून निघून गेली होती. त्यानंतर महाराष्ट्र राज्य मिसिंग केस इन्वेस्टीगेशन ग्रुपच्या सदस्यांनी या मुलीचा आजूबाजूच्या परिसरात शोध घेण्यास सुरुवात केली. तेव्हा रांजणगाव येथून पासलकर यांना एका शिपायाचा फोन आला त्यांनी मुलगी रांजणगावात सुखरूप असल्याची माहिती दिली. यावेळी पासलकर यांनी पोलीसांना माहिती दिली त्यावेळी स्वत:पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून खात्री करून घेलती त्यानंतर सर्वांनी सुटकेचे श्वास सोडला.

चिमुकलीच्या शोधासाठी स्वत: पोलीस आयुक्त उतरले रस्त्यावर

१२ मुलगी मिसिंग झाल्याची माहीती मिळताच पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार मुलीचा शोध घेण्यासाठी रस्त्यावर उतरले. आयुक्त स्वत:वाघोतील दाखल झाल्यामुळे परिसरात मोठा पोलीसांचा फौजफाटा दाखल झाला होता. यावेळी आयुक्तांनी मुलीचा शोध घेणाऱ्यास एक लाख रुपयांचे बक्षिस देखील जाहिर केले होते. दरम्यान या घटनेवरून पुणे पोलीसांची संवेदनशिलता पुणेकरांना बघावयास मिळाली. यावेळी पुणे पोलीसांवर कौतुकांचा वर्षाव पुणेकरांनी केला.

१२ वर्षीय मिसिंग मुलगी आपल्या आई-वडीलांच्या कुशीत विसावली हे महाराष्ट्र राज्य मिसिंग केस इन्वेस्टीगेशन ग्रुपच्या सर्व सदस्यांमुळे शक्य झाले. आतापर्यंत आम्ही ३८३ मिसिंग केसेस या ग्रुपच्या माध्यमांतून मार्गी लावल्या आहेत. यापुढेही आपण असेच काम या ग्रुपच्या माध्यमातून करणार असल्याचे शिवाभाऊ पासलकर (महाराष्ट्र राज्य मिसिंग केस इन्वेस्टीगेशन ग्रुप अध्यक्ष) यांनी सांगितले.

# अखेर पुणे बाजार समितीचा तपासणी अधिकारीच बदलला..!

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कामकाजाची तपासणी करण्यासाठी तत्कालीन पणन सहसंचालक दीपक शिंदे यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणूक करीत १५ दिवसांच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश तत्कालीन पणन संचालकांनी दिले. त्यानुसार आजअखेर म्हणजे जवळपास सहा महिने होऊनही तपासणी अहवाल दाखल झालेला नसून पणनच्या आदेशाला केराची टोपली दाखवित आणि आपली बदली झाल्याचे कारण पुढे करीत शिंदे यांनी या तपासणीतून सुटका करून घेतली आहे.

विद्यमान पणन संचालक विकास तपास रसाळ यांनी या तपासप्रश्नी शिंदे यांना कोणतीही कारणे दाखवा नोटीसही न बजावता त्यांची विनंती मान्य करीत दुसर्या अधिकार्यावर तपासणीची जबाबदारी सोपविल्याने त्यांनी शिंदे यांना अभयच दिल्याची बोचरी टीका अधिकार्यांमधून सुरू झाली आहे. यातून पणन संचालनालयातील अधिकार्यांमधील शह-काटशहाचे शीतयुद्ध पुन्हा चव्हाट्यावर आले आहे. त्यातून बाजार समित्यांवर कार्यालयाचा धाकच राहिलेला नसल्याची चर्चा सुरू झाली आहे.

याबाबतची माहिती अशी की, तत्कालीन पणन संचालक डॉ.




केदारी जाधव यांनी पुणे बाजार समितीच्या दिनांक १ एप्रिल २०१९ ते ३० सप्टेंबर २०२३ या कालावधीतील कामकाजाची तपासणी करण्यासाठी शिंदे यांच्यावर तपासणीची जबाबदारी सोपविली. तसे आदेश त्यांनी १९ ऑक्टोबर रोजी देत पंधरवड्यात अहवाल सादर करावेत, असे म्हटले. मात्र, आजअखेर ही तपासणी पूर्ण झालेली नसून पणन संचालकांच्या आदेशाला अक्षरश: वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या आहेत. दरम्यान, तपासणी अहवालच तयार झालेला नसल्याची माहिती गुरुवारी (दि.१८) पणन संचालक विकास रसाळ यांनीच दिली. आता शिंदे यांच्याऐवजी दुसरे पणन सहसंचालक राजेंद्रकुमार दराडे यांच्यावर तपासणीची जबाबदारी सोपविण्यात आल्याचे ते म्हणाले.

पुण्यातील राज्य कृषी पणन मंडळात सरव्यवस्थापक आणि मॅग्नेट प्रकल्पाची संयुक्त जबाबदारी सांभाळणारे दीपक शिंदे यांची शासनाने सहकारचे विभागीय सहनिबंधक म्हणून लातूर येथे बदली केली. ही बदली शिंदे यांनी आपले सर्वतोपरी 'वजन' वापरून मंत्रालयातून रद्द करीत पुण्यातच पणन सहसंचालकपदी वर्णी लावून घेतली. आता पणन संचालक कार्यालयातून ते पुन्हा वखार महामंडळात सहव्यवस्थापकीय संचालक म्हणून पूर्णवेळ रुजू झालेले आहेत.

विशेष म्हणजे त्यांनी यापूर्वी वखार महामंडळात महाव्यवस्थापक म्हणून काम केलेले होते. आता बदलीचे कारण पुढे करून शिंदे यांनी पुणे बाजार समितीच्या तपासणीमधून स्वतःची सुटका करून घेतली आणि पणन संचालनालयाने त्यांना अहवाल दाखल न झाल्याबद्दल साधी नोटीसही न दिल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

## रॅगिंगप्रकरणी ससूनच्या डीनचा अजब खुलासा; रॅगिंग प्रकरण दडपण्याचा प्रयत्न?

**पुणे । प्रतिनिधी**

बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात गेल्या दोन महिन्यांमध्ये रॅगिंगचे दोन प्रकार घडल्याची धक्कादायक माहिती समोर आली. संबंधित प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आल्याचे ससून प्रशासनाकडून सांगण्यात आले. मात्र, आता घूमजाव करत ससूनचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांनी रॅगिंगचा प्रकार घडलाच नसल्याचा अजब खुलासा केला आहे. त्यामुळे रॅगिंग प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत असल्याची शंका व्यक्त केली जात आहे. बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांनी दोन दिवसांपूर्वी तरुणींकडून तक्रार प्राप्त झाली असून चौकशी सुरू केल्याचे सांगितले.

त्यानंतर, काय कारवाई करणार याबाबत पत्रकारांकडून सातत्याने विचारणा झाल्यावर बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात रॅगिंग झाले नसल्याचे स्पष्टीकरण दिले. गुरुवारी अधिष्ठाता कार्यालयात दुपारी ३ ते ५.३० वाजण्याच्या दरम्यान रॅगिंगसंदर्भात आधी मार्ड संघटनेच्या सदस्यांची आणि त्यानंतर सर्व विभागप्रमुखांची बैठक झाली. तरीही, डॉ. काळे यांनी याबाबत माध्यमांना माहिती देण्यास नकार दिला.बी. जे. वैद्यकीय महाविद्यलयात क्ष-किरणशास्त्र (रेडिओलॉजी) आणि भूलशास्त्र (अॅनेस्थेसिया) या विभागांत पदव्युत्तर पदवीच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या दोन महिला निवासी डॉक्टरांवर रॅगिंग झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

## महावीर जन्मकल्याण महोत्सवानिमित्त चिंचवडमध्ये पालखीचे आयोजन

पिंपरी । प्रतिनिधी

चिंचवड(सुदर्शन नगर) येथील श्री अरिहंत दिगंबर जैन ट्रस्टच्या वतीने १००८ श्री महावीर भगवान जन्मकल्याण महोत्सवानिमित्त पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष नेमीचंद ठोले, कार्याध्यक्ष शीतल पहाडे, सतीश दोशी, शीतल शाह यांनी दिली



दि.२१ एप्रिल रोजी स.७.३० ते ९.३० या वेळेत हि पालखी चिंचवड परिसरातून काढण्यात येईल.आचार्य विद्यासागरजी यांच्या आशीर्वादाने आयोजित

पालखी सोहळयाची सुरुवात सुदर्शन नगर येथील १००८ श्री मुनिसुव्रतनाथ

दिगंबर जैन मंदिरापासून होईल. दुर्गा कॉर्नर- लिंक रोड- गावडे पेट्रोल पंप- सुदर्शन नगर मार्गे मंदिरात सांगता होईल.

या रथयात्रा फेरीत सुमारे तीनशे भाविक सहभागी होणार आहेत.

या व्यतिरिक्त मंदिरात स ९ ते ११ अभिषेक, शांतीधारा,सामूहिक पूजन,११:३० वा भगवान महावीरांचा पाळणा, वात्सल्य भोज, १० ते २ वाजेपर्यंत रक्तदान शिबीर, संध्याकाळी महाआरती असे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. ट्रस्टच्या माध्यमातून मुलींचे व मुलांचे वसतीगृह तथा अतिथि निवास, समाजातील नवीन पीढ़ी सुसंस्करित करण्या साठी पाठशाला, गरजू नागरीकांसाठी वैद्यकीय व शैक्षणिक मदत आदी उपक्रम करण्यात येतात.

# माझ्यातील सुजाण-सगज वाचक आई-वडिलांनी घडविला-गौरी देशपांडे

### भाषेच्या आवडीमुळे वाचन, अभिवाचनाची आवड : शर्व गाडगीळ; पहिल्या बालसाहित्य महोत्सवात 'श्यामची आई' चित्रपटातील कलावंतांशी संवाद

पुणे । प्रतिनिधी

आईने वैचारिक पुस्तकांची ओळख करून दिली व माझ्यातील सुजाण आणि सजग वाचक घडविला. काय वाचावे आणि कसे वाचावे याचे संस्कार बालपणापासूनच झाले, अशा भावना गौरी देशपांडे हिने व्यक्त केल्या. बालपणापासूनच वाचनाची आवड आहे. पूर्वी मी आधुनिक तंत्राचा वापर करून वाचन करीत होतो. परंतु चित्रपटासाठी म्हणून श्यामची आई पुस्तक पहिल्यांदा वाचले आणि आता पुस्तके हाताळायलाही आवडते आहे, असे शर्व गाडगीळ याने सांगितले.

पुस्तक वाचन चळवळ राबविणाऱ्या 'भावार्थ' आणि संवाद पुणे यांच्या संयुक्त आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या बालसाहित्य महोत्सवातील दुसऱ्या दिवशी (शुक्रवारी) साधना प्रकाशनतर्फे 'श्यामची आई' चित्रपटातील गौरी देशपांडे (आई) आणि शर्व गाडगीळ (श्याम) यांच्याशी गप्पा-गोष्टींचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी गौरी आणि शर्व यांनी मराठी साहित्य वाचनाबरोबरच चित्रपटातील भूमिकांचा प्रवास उलगडून दाखविला. त्यांच्याशी भावार्थच्या व्यवस्थापिका कीर्ती जोशी यांनी संवाद साधला. भावार्थचे सल्लागार प्रसाद मिरासदार, संवाद पुणेचे सुनील महाजन, साधनाचे संपादक विनोद शिरसाठ, बालसाहित्यकार राजीव तांबे, भावार्थचे संस्थापक प्रसन्न करंदीकर आदी उपस्थित होते. 'भावार्थ साहित्य दालन', सक्सेस स्क्वेअर, कर्वेपुतळ्याजवळ, कोथरूड येथे बालसाहित्य महोत्सव सुरू आहे.

चित्रपटातील भाषा, व्यक्तिमत्त्व साकारताना आलेले अनुभव




कथन करताना गौरी म्हणाली, मी पुस्तकाचे अनेकदा वाचन केले. संहिता समजावून घेतली. चित्रपटातील प्रसंग समजावून घेत एकत्रितपणे चर्चा करून शंभर वर्षांपूर्वी वापरात असलेल्या भाषेचा सराव केला. तालमी करताना मी व शर्वने एकत्रितपणे घालविला वेळ भूमिका निभावताना उपयोगी पडला व आमच्यात अनुबंध निर्माण झाले. आम्ही दोघे मित्रत्वाने वागत होतो, एकमेकांची ओळख करून घेत होतो त्यामुळे प्रत्यक्ष चित्रिकरण प्रसंगी चित्रपटात शंभर वर्षांपूर्वी बोलली जाणारी भाषा परकी वाटली नाही. श्यामच्या आईची भूमिका करताना खूप वेदना, आनंद, भावनिकता यांचे मिश्रण मनात होते आणि संहितेमुळे पुस्तकाकडे बघण्याचा दृष्टीकोनच बदलला.

सुजाण पालकत्वाविषयी काहीही लिहिले जात नसतानाच्या काळात आपले प्रत्येक मुल हे स्वतंत्र आहे, त्याची जडणघडण, त्याची भावनिक-मानसिक गरज वेगवेगळी असू शकते हे ओळखून वागणारी श्यामची आई साकारताना माझ्याही विचारात बदल घडले. सर्व बाजूंनी खोलवर विचार करण्याची प्रक्रिया प्रगल्भ झाली, असे गौरी म्हणाली.

शर्व म्हणाला, लहानपणापासूनच नाटक, नृत्य तसेच विविध कलास्पर्धांमध्ये भाग घेत होतो. आई-बाबा दोघेही कला क्षेत्रात असल्याने मला भाषेची आवड निर्माण झाली. चित्रिकरणादरम्यान शाळेचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे त्याने आवजूर्न सांगितले. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर सगळ्यांनी कौतुक केले. श्याम या भूमिकेचा प्रभाव काही दिवस टिकून होता पण त्यानंतर शर्व म्हणून वावरण्यात काही अडचण आली नाही. भाषेच्या आवडीमुळेच आजही कवितावाचन, अभिवाचन आवडीने करत आहे. तसेच क्रिकेट, फुटबॉल, टेबलटेनिस हे खेळ खेळणे आणि स्क्रिन बघणेही आवडते, असे त्याने एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

ऐकणे, बोलणे, लिहिणे, वाचणे हे भाषेचे महत्त्वाचे पैलू आहेत. मातृभाषेचे महत्त्व लक्षात घेऊन पालकांनी मुलांना नकळत्या वयापासूनच गोष्टी सांगून, मुलांसोबत वाचन करून मोबाईल युगात पुस्तकांची गोडी लावणे आवश्यक आहे. मोबाईल हातातून काढून पुस्तक देणे हे वाचनाविषयी अरुची निर्माण करू शकते, असे गौरी हिने एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. श्रद्धा मयेकर यांनी प्रास्ताविक केले तर सत्कार कार्यकारी व्यवस्थापक पंकज कुरटे यांनी केला.

आज (शनिवार) महोत्सवात शनिवार, दि. २० रोजी मराठी विज्ञान परिषदेतर्फे 'हसत खेळत विज्ञान' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून यात विनय र. र. आणि राजीव तांबे यांचा सहभाग असणार आहे.

# कलाकृती कलाकारापेक्षा दीर्घायुषी असते-वासुदेव कामत










## 'एमआयटी एडीटी विश्वारंभ कला पुरस्कारा'चे वितरण

**पुणे । प्रतिनिधी**

चित्रकार कलेच्या माध्यमातूनच आपले विचार मांडण्याचा प्रयत्न करत असतो. कलाकार कलाकृती साकारत असतो तोपर्यंतच ती त्याच्या मालकीची असते. एकदा का त्याने तिच्यावर सही केली ती सार्वजनिक होते. इतिहासात कायमच योगदानाची नोंद राहते व्यवहाराची नाही. कारण, कलाकृती ही कलाकारापेक्षा जास्त आयुष्य घेऊन जन्मते, त्यामुळे कलाकाराने केवळ व्यवहारावर भर न देता योगदानावर भर द्यावा व अखेरीस शांती व तृप्ती रसाचा आनंद घ्यावा, असे प्रतिपादन प्रसिद्ध चित्रकार वासुदेव कामत यांनी केले.

तेएमआयटी आर्ट, डिजाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणेच्या ललित कला, परफॉर्मिंग आर्ट्स, मीडिया, डिझाइन आणि आर्किटेक्चरचा सर्वांत मोठा महोत्सव असणाऱ्या कारी-२०२४ निमित्ताने राजा रविवर्मा आर्ट गॅलरी येथेआयोजित 'विश्वारंभ कला पुरस्कार' स्विकारल्यानंतर बोलत होते.याप्रसंगी, प्रसिद्ध दिग्दर्शक जब्बार पटेल, माईर्स एमआयटी शिक्षण समुहाच्या कार्यकारी संचालक सौ.ज्योती ढाकणे, एमआयटी एडीटी विद्यापीठाचेप्र.कुलगुरू डॉ.अनंत चक्रदेव, डॉ.मिलिंद ढोबळे, डॉ.आनंद बेल्हे,डॉ.अश्विनी पेठेआदी उपस्थित होते.

कामत यांनी आपल्या अमोघ वाणीतून रसिकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी ते पुढे म्हणाले, आपल्या क्षेत्रामध्येप्रत्येक जण मी अप्लाईड आणि फाईन आर्टिस्ट आहे, असे सांगतो. परंतू माझ्या मते आपले कलाकार असणे आणि त्यापेक्षाही आपल्यातील कला'कारी' अधिक महत्त्वाची असते. कला ही मनुष्याच्या अंतापर्यंत साथ देते, आणि ज्याला कलेची आवड आहे, त्यालाच मनुष्य म्हटले जाऊ शकते.प्रा.डॉ.चक्रदेव यावेळी म्हणाले, 'कारि' म्हणजे, काहीतरी नाविण्यपूर्ण घडविणे. ज्यामध्ये कविता, कलाकृती, चित्र, फोटो, तंत्रज्ञान, चित्रपट अशा प्रत्येक गोष्टीचा अंतर्भाव होऊ शकतो. एमआयटी एडीटी विद्यापीठाचा कॅम्पस मुळात अनेक कलाकृतींचा संगम असून जेथून अनेक कलाकार घडत आहेत.

विश्वशांती प्रार्थनेने सुरू झालेल्या या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली, ज्याचे सुत्रसंचालन स्नेहा वाघटकर यांनी केले. कोट बंद आखोंसे देखे गये सपनों को जो साकार करें वो कलाकार होता है!, अगदी तशाच प्रकारे'विश्वारंभ', या नावातच काहीतरी नाविन्यपूर्ण तयार करण्याची संकल्पना जडलेली आहे. अर्थातच या नावामागे आणि या पुरस्कारामागे आमचे मार्गदर्शक प्रा.डॉ.विश्वनाथ दा.कराड यांची प्रेरणा आहे. प्रा.डॉ.कराड हेही एक सुंदर कलाकार आहेत. जगातील सर्वांत मोठा विश्वशांती घुमट आणि विश्वराजबागेची बांधनी या त्यांच्याच दृष्टीतून साकारल्या गेलेल्या अप्रतिम कलाकृती आहेत. त्यामुळे आज श्री.वासुदेव कामत यांना 'कारि' प्रसंगी 'विश्वारंभ कला पुरस्कार' प्रदान करताना अतिशय आनंद होत आहे. - सौ.ज्योती ढाकणे - कराड कार्यकारी संचालक, माईर्स एमआयटी शिक्षण समुह

## कलाकृती भविष्याशी संवाद साधतात - पटेल

_आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रसिद्ध दिग्दर्शक जब्बार पटेल यांनी अनेक गोष्टींवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, जेव्हा मी कुठल्याही कलाकाराला विचारतो तेव्हा तो काहीतरी नवीन साकारतोय असे म्हणतो. परंतू जगात नवीन असे काहीच नाही. कारण एक कलाकार सर्वच गोष्टी आपल्या भवतालच्या गोष्टींना पाहून साकारत असतो. त्यात तो जी काही कलाकारी साकारतो ती इतिहासाचा अविभाज्य भाग होऊन जाते. त्यामुळे, कलाकारांच्या कलाकृती भविष्यातील पिढीशी संवाद साधण्याचे काम करता. त्यामुळे, कलाकाराचा हात नाजूक असला तरी त्याची कलाकृती मात्र कणखर हवी, असेही पटेल यांनी म्हटले.